दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

रविवार पुरवणी २१ जुलै २०२४



## 'जिल्हापरिषद शाळा विद्यार्थी पटसंख्या दुरावस्थेला जबाबदार कोण.....?'

**श्री.धनंजय शेटये**
**गोळवण,मालवण,सिंधुदुर्ग**



जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थी पटसंख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. तळकोकणातील शाळेतील विद्यार्थी पटसंख्या दोन अंकी संख्या गाठणेही मुश्कील झालेले दिसून येते. मध्यमवयीन लोकसंख्या नोकरी धंदा, सुखसुविधा आणि शहरी ऐशोआराम अशा लक्झरी लाईफचे आकर्षण यामुळे मुंबई, पुणे सारख्या शहरी भागात स्थलांतरित होत आहे, त्यामुळे अशा स्थलांतरित पालकांचा आपल्या मुलाबाळांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकण्याचा हव्यास हे कारण देखील जरी खरे असले तरीही शिक्षणपद्धतीने अद्ययावत होणे हि आजच्या काळाची गरज आहे.

आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात आपण स्वतःला अपडेट ठेवले नाही तर आधुनिकतेच्या स्पर्धायुक्त जगात आपण केव्हा लुप्त होऊ हे समजणार देखील नाही. अशी अनेक उदाहरणे आपल्या सभोवती आहेत. यातील उत्तम उदाहरण म्हणून एच.एम.टी. घड्याळ कंपनी आपण घेऊ शकतो. एकेकाळी एच.एम.टी. घड्याळ कंपनी सर्वोच्च शिखरावर होती. पण या कंपनीने बदलत्या काळानुसार आपल्यात बदल घडवून आणले नाहीत. स्पर्धेच्या युगात दुरापास्त झाली. तीच गोष्ट नोकिया मोबाईलची कंपनीची झाली. वेळीच स्वतःला अद्ययावत केले असते तर आज ही कंपनी सर्वोच्च शिखरावर पोहोचली असती. नोकियाने अॅन्ड्राईड फोन मार्केटमध्ये आणताना बराच उशीर केला.

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात आधुनिकतेच्या साधनांचा वापर करून अध्यापन पद्धतीचा अवलंब केला, तसेच इंग्रजी भाषेचा परिचय लिखाण कौशल्यापुरता मर्यादित न ठेवता तो संप्रेषणासाठी अति महत्त्वाचा केला गेला तर या शाळांना परत एकदा सोनेरी दिवस आणता येतील असे मला एक शिक्षक म्हणून वाटते. आज मातृभाषेतून शिक्षण असायला हवे आहे याचा पुरस्कार करणाऱ्या मराठी भाषाप्रेमींनी विचार करायला हवा की फक्त मराठी भाषेतून शिक्षण घेतले तर गुणवत्ता प्राप्त होईल. पण आजच्या स्पर्धेच्या युगात इंग्रजी संभाषण कौशल्याशिवाय टिकाव लागणार आहे का ?

इंग्रजी संभाषण कौशल्य आत्मसात झाले नाही तर त्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या मनात एक प्रकारचा न्युनगंड निर्माण होतो. इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या मुलांचे इंग्रजी संभाषण कौशल्य जमेची बाजू ठरत असते. इंग्रजी न आल्यामुळे आमचं कुठे काय बिघडलं ? अशा प्रतिक्रिया नेहमीच आजूबाजूला ऐकू येतात. परंतु आजचे आणि येणारे युग हे स्पर्धेचे आहे. आज प्रचंड गुणवत्ता प्राप्त करणारी मुलं आहेत. पुढच्या काळात प्रत्येक मुलाने, मग तो शहरातील असो व गावातील, या स्पर्धात्मक युगात स्वतःला अद्ययावत करत यश प्राप्त केले पाहिजे. जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलांना इंग्रजी माध्यमातील मुलांच्यापेक्षा अधिक खोलपणे विषय समजलेला असतो पण तोच विषय जर इंग्रजीमध्ये मांडण्यास सांगितला तर तो विद्यार्थी इथे कमी पडतो.त्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये इंग्रजी विषयाच्या बोली भाषेचा सराव करणे गरजेचे आहे.

भारतीय सरकारी मराठी माध्यम शाळांमध्ये इंग्रजी शिकवण्याचे महत्त्व विविध अंगांनी स्पष्ट होते. याची अनेक कारणे आहेत, ज्यामुळे विद्यार्थी जागतिक पातळीवर स्पर्धात्मक बनेल, रोजगाराच्या संधी वाढतील, आणि एकंदर शैक्षणिक विकास होईल

इंग्रजी ही जागतिक भाषा असल्याने, तिच्या ज्ञानामुळे विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवरच्या संधींमध्ये अधिक सहभाग घेता येतो.. येथे काही प्रभावी उपाय दिले आहेत, ज्यामुळे मराठी प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये इंग्रजी बोलण्याचे कौशल्य विकसित करता येईल. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष संवाद साधण्याच्या प्रक्रियेत सहभागी करून घेऊन विविध प्रकारच्या संवादात्मक कृती म्हणजेच रोल प्ले, संवाद सत्र, आणि समूह चर्चा आयोजित करता येतील . यामुळे विद्यार्थ्यांना साधे संवाद कसे साधावे हे कळेल याशिवाय शब्दकोश खेळ, चित्रकला आणि वर्णन, शब्द ओळखणे, शब्द तयार करणे, अशा क्रियाकलापांमुळे विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलण्याचा सराव करता येईल. नाटक आणि अभिनयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संवाद कौशल्यांचा सराव करता येऊ शकेल. वेगवेगळ्या भूमिका निभावल्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल आणि त्यांच्या संवाद कौशल्यांचा विकास होईल. लहान लहान नाट्य प्रयोग आयोजित केल्यामुळे त्यांच्यातील बोलण्याचे धाडससुद्धा वाढेल. गुणवत्ता, बुद्धिमत्ता तर आजही जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये दिसून येते. या सर्व उपायांचा एकत्रित वापर केल्यास मराठी प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे इंग्रजी बोलण्याचे कौशल्य अधिक प्रभावीपणे विकसित होईल. त्यामुळे त्यांना भविष्याच्या संधींचा लाभ घेता येईल आणि जागतिक पातळीवर अधिक स्पर्धात्मक बनेल. इंग्रजी शिकवण्यासाठी स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टर, आणि ऑडिओ-व्हिज्युअल सामग्री, तसेच इंग्रजी शिकवणाऱ्या ॲप्स आणि ऑनलाइन साधनांचा उपयोग करता येईल.शब्दसंपत्ती वाढवण्यामुळे विद्यार्थ्यांना संवाद साधणे सोपे होईल. नविन शब्द शिकवण्यासोबत त्यांचा वापरही कसा करावा हे कळेल .दररोज नवीन शब्द आणि त्यांचे अर्थ शिकवावेत.त्या शब्दांचा वाक्यरचनेत वापर करून दाखवावा.

आपली मुलं घरी इंग्रजी संभाषण करताना पाहून पालक पुन्हा एकदा जिल्हा परिषदेच्या शाळांकडे आकर्षित होतील. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत भरमसाठ फी भरून शिक्षण घेण्यापेक्षा जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घेतील. जेव्हा जग बदलत नसतं तेव्हा स्वतःला बदलायला शिकले पाहिजे. जग हळूहळू का असेना पण नक्कीच बदल होऊ शकेल.

शिक्षक हा तीन पिढ्या घडवित असतो त्यामुळे शिक्षकांची ही जबाबदारी ही अत्यंत महत्त्वाची असते. शिक्षकांनी स्वतःचे इंग्रजी बोलण्याचे कौशल्य विकसित करत इंग्रजी शिकवण्याच्या आधुनिक पद्धती शिकाव्यात. सरकारनेही शिक्षकांसाठी इंग्रजी बोलण्याचे आणि शिकवण्याचे विशेष प्रशिक्षण सत्रे आयोजित करावीत.

या सर्व उपायांचा एकत्रित वापर केल्यास मराठी प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे इंग्रजी बोलण्याचे कौशल्य अधिक प्रभावीपणे विकसित होईल. त्यामुळे त्यांना भविष्याच्या संधींचा लाभ घेता येईल आणि जागतिक पातळीवर अधिक स्पर्धात्मक आत्मविश्वासाने उभी राहतील.

## नवीन सदर

**!) समाजात वावरताना आवश्यक कायदे व त्यासंबंधीची प्राथमिक माहिती प्रत्येक सर्वसामान्य नागरिकास असायला हवी या उद्देशाने ठाणे, मुंबई येथील विख्यात विधितज्ज्ञ, प्रथितयश लेखक, वकील व नोटरी असलेले श्रीनिवास भार्गवराम घैसास हे दै. सिंधुदुर्ग समाचारच्या वाचकांसाठी 'कायद्याचे बोलूया!' ही साप्ताहिक लेखमाला घेऊन येत आहेत.**
**सिंधुदुर्ग समाचारचे सर्व वाचक व संपूर्ण समाजालाच या सदराचा फार मोठा उपयोग होईल अशी खात्री आहे.**

**2)नवे सदर- या लाडक्या मुलांनो - लेखक-प्रवीण कुबल**

# गुरुविन जगीं थोर काय?

## मनाच्या हिंदोळ्यावर

बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९५९५५.





बत्तीस वर्षांपूर्वी मालवणच्या सुनितादेवी टोपीवाला अध्यापक विद्यालयात पाऊल ठेवले तेव्हा थोडा बावरल्यासारखा झालो होतो. इयत्ता बारावीपर्यंतचे शिक्षण तसे गावातच झाल्याने आणि माझा स्वभाव बालपणापासूनच 'बुजरा' असल्याने मालवणसारख्या शहरात पाऊल टाकताच मी कावरा बावरा झालो. मात्र पहिल्याच दिवसापासून माझी संतोष, तातु, बंड्या, राजन वगैरेंशी छान गट्टी जमली. आम्हाला शिकविणारे सर्व शिक्षक तर प्रथमदर्शनी 'रागीट' दिसत होते. पण पुढे पुढे त्यांच्याविषयीची भीती कमी होत गेली.

प्रा. अविनाश खानोलकर उर्फ 'आबा' आमचे प्राचार्य होते. शिक्षकांच्या स्टाफरुमजवळच त्यांची केबिन होती. ते केबिनमध्ये बसलेले असताना समोरच्या व्हरांड्यातून जाताना एक अनामिक भीती वाटायची. ते केबिनमध्ये असले तरी एका कटाक्षात बाहेरचा गोंगाट बंद करायचे. ट्रेनिंग कॉलेजमध्ये बहुतेकजण त्यांना 'सर' ऐवजी 'आबा' अशीच साद घालायचे. त्यामुळेच पुढे आम्हीदेखील खानोलकरसरांना आबाच म्हणू लागलो. आबा दोन्ही वर्षासाठी गणित व विज्ञान शिकवायचे. आबांचे या दोन्ही विषयांवर प्रभुत्व होते. कधी कोणी त्यांना झोपेतही गणितातले एखादे प्रमेय किंवा विज्ञानातील एखाद्या रासायनिक अभिक्रियेचे समीकरण विचारले तरी ते फाडफाड सांगतील इतके ते प्रभुत्व होते.

एकतर ते प्राचार्य असल्याने आणि गणित, विज्ञान सारखे 'कठीण' विषय शिकवीत असल्याने आबांचा तास जवळ आला की एक अनाहूत भीती वाटायची. पण एकदा का आबांनी वर्गात प्रवेश केला की मग आम्ही सर्व विद्यार्थी आबांच्या तासात रंगून जायचो. दोन्ही वर्गांचा, दोन्ही विषयांचा संपूर्ण अभ्यासक्रम आबांना मुखोद्गत होता. कोणताही धडा किंवा 'टॉपिक' शिकविताना आबांनी कधी म्हणून पुस्तक हातात घेतल्याचे आम्ही पाहिले नाही. एखादे कठीण प्रकरण अगदी सोपे व सोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांच्या 'गळी' उतरविण्याची एक जबरदस्त आणि अभिजात कला आबांना अवगत होती. याशिवाय कधीही आणि केव्हाही आबांना खुर्चीत बसून, टेबलाजवळ उभा राहून किंवा वर्गात समोर उभा राहून एखादा तास शिकविल्याचेही आम्ही कधी पाहिले नाही. त्यांच्या वाट्याच्या पस्तीस मिनिटांच्या तासिकेत ते संपूर्ण वर्गात फिरायचे, वर्गाचा कोपरा न कोपरा धुंडाळायचे. प्रत्येक विद्यार्थ्याकडे त्यांचे बारीक लक्ष असायचे. याशिवाय ते अध्यापनाच्या विषयात इतके रमून जायचे की, त्यांच्या तासाला डुलकी घेण्याची, टंगळ मंगळ करण्याची कोणाची हिंमत व्हायची नाही. मुळातच आबांचे अध्यापन इतके प्रभावी होते की, वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला आबांचा तास संपूच नये असे वाटायचे. आबांचा तेथील प्रशासन व व्यवस्थापनावरही वचक होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व भारदस्त होते. ते कॉलेजच्या आवारातून चालू लागले तरी सगळे वर्ग चिडीचूप व्हायचे. आबा प्राचार्यपदासोबत आमच्या वसतिगृहाचे व्यवस्थापनही बघायचे. वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांसाठी मुलभूत सोईसुविधा, वसतिगृहाची शिस्त, विद्यार्थ्यांचे वर्तन यांवरही त्यांची करडी नजर असायची. आबा स्वतः छान गायकी करायचे. हार्मोनियम वाजवायचे. 'सिंधुदुर्ग परिमल' नावाच्या संस्कृती व कला क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेचा डोलारा तेच संभाळायचे. आम्ही त्या दोन वर्षांत या संस्थेचे विविध उपक्रम पाहिले, अनुभवले आणि कधी कधी एखाद्या कार्यक्रमाचा भागही बनलो. आबांचे सामाजिक कार्यातही फार मोठे योगदान होते. मालवणातील 'सेवांगण' च्या माध्यमातून त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग घेतला. धुरीवाड्यातील मच्छिमार समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी तेथील लोकांना आबांनी अल्पबचतीची सवय लावली. दर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आम्ही सर्व विद्यार्थी आबांसोबत धुरीवाड्यात फिरून ठरलेल्या घरांमधून पोस्टाच्या 'आवर्त' योजनेचे पैसे जमा करायचो.

मला वाटते, आम्ही दुसऱ्या वर्षी कॉलेजमधून बाहेर पडलो आणि आबाही सेवानिवृत्त झाले. मात्र सेवानिवृत्तीनंतरही आबांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य थांबले नाही. पुढे आम्ही शिक्षकी पेशात नियुक्त झाल्यावर आमच्या दापोली येथील एका 'स्मार्ट पिटी' प्रशिक्षणात आबा ' विशेष तज्ञ मार्गदर्शक' म्हणून आले होते. मालवणची व्यक्ति अशा प्रकारे खास मार्गदर्शनासाठी दापोली येथे यावी यातच आबांचे श्रेष्ठत्व दिसून येते.

आज आबांनी नव्वदी कधीच पार केली आहे. मात्र वयोमानानुसार आबांची प्रकृती आणि स्मरणशक्ती दोन्ही उत्तम आहेत. परवा आबा त्यांच्या प्रविणाकडे आल्याचे समजताच मी प्रविणाच्या आंजर्ले येथील घरी गेलो. आबा बाहेरच खुर्चीत बसले होते. मला पाहताच ते म्हणाले," ये घाडीगांवकर ये. अरे तुझा तो दुसरा घाडीगांवकर कुठे असतो?" आमच्या काळातले ट्रेनिंग कॉलेज, त्याची आजची अवस्था वगैरे अनेक विषयांवर आमच्या गप्पा झाल्या. त्या काळातील अनेक प्रसंग आबांना आजही जसेच्या तसे आठवतात. आबांसारखे उच्च कोटीची प्रगल्भ व ज्ञानी असलेले गुरुवर्य आमच्यासारख्या हजारो विद्यार्थ्यांना लाभले हे आमचे महद्भाग्यच म्हणावे लागेल. आबांइतका ज्ञानी व प्रभावी दुसरा 'अध्यापक' मी आजवर पाहिला नाही. कदाचित यापुढे देखील तसा कोणी होणार नाही. आजच्या गुरुपौर्णिमेनिमित्त माझ्या प्रिय आबांना विनम्र वंदन. आबांना यापुढेही निरामय दीर्घायुष्य लाभूदे हीच परमेश्वरचरणी प्रार्थना.

---

# सुंदर मी होणार!

## या लाडक्या मुलांनो



प्रवीण कुबल,
शिडवणे, ता. कणकवली.

सुंदर दिसण्यासाठी प्रत्येकजण प्रयत्न करत असतात. सुंदर दिसणं आणि सुंदर असणं या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. शाळेत येणारी सर्वच मुलं सुंदर असतात. ती शरीराने आणि मनाने दोन्ही प्रकारे सुंदर असतात. त्यांच्या मनाचा ठाव घेता आला तर ? किती सुंदर विचारांचं मधाळ पोळं आपल्या सोबत सतत असतं हे माझ्यासारख्या शिक्षकांचं भाग्यच.

मनात सुंदर भावना घेऊन आलेली ही निष्पाप मुले सतत आमच्या सहवासात असतात. आमच्या जीवनाचं जणू सोनंच होऊन जातं. नोकरीत असताना आम्ही हे दुर्मिळ भाग्य नित्यनियमाने अनुभवत असतो. शाळेत येणारी मुले रोज नव्या दमाने शिकण्यासाठी आतुरतेने आपल्याकडून अपेक्षा ठेवत असतात. आपण त्यांच्या अपेक्षांना किती पात्र ठरतो देव जाणे ? आपलं आणि त्यांचं एकदा जमलं की ती आपल्यावर पालकांपेक्षा जास्त विश्वास ठेऊ लागतात. त्यांच्या विश्वासाला आपण अजिबात तडा पडू देता कामा नये हे सतत आपल्या लक्षात असायला हवं. कारण आपण शिक्षकच त्यांचे पहिले वहिले आदर्श असतो. म्हणून पहिलीची मुलगी तिला ' तू कोण होणार ? ' म्हणून विचारताच झटक्यात सांगून टाकते, ' मी पहिलीच्या बाई होणार !!! ' तिचं हे उत्तर आपल्याला सर्वांनाच विचार करायला लावणारं आहे. ती शाळेत आल्यापासून पहिलीच्या बाईंकडेच पाहत असते. बाई जशा बोलतात, तशीच ती बोलण्याचा प्रयत्न करत असते. बाई वर्गात कशा शिकवतात, कशा ओरडतात, कधी मारतात याकडे तिचं बारकाईने असलेले लक्ष गांभीर्याने घेतले पाहिजे. अर्थात ही गोष्ट घरच्यांना सुद्धा लागू पडते.

कारण लहान मुलांचं हे बालमन टिपकागदासारखं सगळ्या गोष्टी टिपण्याचं काम करत असतं. मोठ्या माणसांनी, शिक्षकांनी केलेल्या सगळ्याच गोष्टी बरोबरच असतात यावर त्यांचा दृढविश्वास असतो. आईने किंवा बाबांनी सोडवून दाखवलेले उदाहरण बरोबर असलं तरी जोपर्यंत बाई त्याला बरोबर म्हणत नाहीत, तोपर्यंत मुलाचा अजिबात विश्वास बसत नाही. याचा अर्थ असा होतो कि आपल्या शाळेत आलेलं प्रत्येक मूल आपल्या सर्व हालचाली लक्षपूर्वक पाहत असतं याकडे आपलं लक्ष असायला हवं. आपण करत असलेल्या अनावश्यक हालचालीसुद्धा मुलांच्या नजरेतून सुटत नसाव्यात. शाळा सुटण्याची वेळ झाली होती. मी सकाळच्या परिपाठाला उपस्थित नसल्याचे एका मुलीच्या दिवसभर लक्षात असेल हे माझ्या लक्षात नव्हतेच. मी शाळेच्या काही कामानिमित्त थोडा उशिरा आल्याने आजचा परिपाठ मला चुकला होता. आज यामिनीचा वाढदिवस होता. . यामिनी नुकतीच पहिलीच्या वर्गात दाखल झाली होती. गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी तिची आणि माझी पुसटशी ओळख झाली होती. शाळा पूर्वतयारी मेळाव्यांच्या दोन टप्प्यांमुळे ती मला वर्गशिक्षक नव्हतोच. चांगलीच ओळखू लागली होती. मी तिचाशाळा सुटता सुटता कुणीतरी दाखल्यासाठी आले होते. मी दाखला बनवून देण्याच्या गडबडीत. माझं लक्ष दाखल्यात काही चुकू नये याकडे लागलं होतं. दाखला लिहून पूर्ण झाला होता. कुणीतरी मला मागे हात लावीत असल्याचं जाणवलं. ती यामिनीच होती. तिचा आज वाढदिवस होता. तिने आपल्या चिमुकल्या हातांनी दोन चॉकलेट्स माझ्याकडे धरली होती. मी आश्चर्यचकित झालो होतो. माझा दाखला लिहून पूर्ण होईपर्यंत ती माझी वाट बघत थांबली होती. आता मी मोकळा झालो आहे असे वाटल्यानंतरच तिने हसतमुखाने हात पुढे केला होता. पहिलीत नव्याने हजर झालेल्या मुलीने मला देण्यासाठी दोन चॉकलेट्स शाळा सुटेपर्यंत खाल्ली नव्हती हे विशेष नमूद करायला हवे. त्यावेळी मला ती मुलगी अतिशय सुंदर दिसली. तिचं ते निरागस सौंदर्य कोणालाही लाजवणारं असंच होतं. ही मुलगी पुढे नक्कीच आदर्शवत होणार यात मला आज तरी शंका वाटत नाही.

डी.डी.एस डेंटल केअर
DDS Dental Care
डॉ.राजेश ज्ञानदेव सावंत
डेंटल सर्जन
बी.डी.एस.
सुविधा
▸ दातांचा एक्स रे ▸ कॅप/ब्रिज बसविणे
▸ रुट कॅनल ट्रिटमेंट ▸ दात साफ करणे
▸ दात काढणे ▸ दातात कॉम्पोझिट
▸ फिक्स दात बसविणे सिमेंट भरणे
9373613138

## कायद्याचे बोलूया!

# गृहनिर्माण संस्थांचे डीम कन्व्हेयन्स आणि त्यावेळी भरावयाचे मुद्रांक शुल्क



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी- भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.

गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीजसजश्या जुन्याहोऊलागल्या आणित्यांची पुनर्बांधणी करणेआवश्यकबनूलागलेत्यावेळेला सगळ्यात मोठाप्रश्नउभाराहिलातोगृहनिर्माण संस्थांच्या इमारतीज्याभूखंडावर उभ्याआहेतत्याभूखंडयाच्या मालकीचा जवळजवळ ७०%-८०% गृहनिर्माण संस्थांकडे याभूखंडाची मालकीचनव्हतीत्यामुळे जीजमीनस्वतःच्या मालकीचीच नाहीत्यावरसंस्थेची इमारतपुन्हाबांधणार कशी ? आणिमालकीविना यालाशासनाकडून अथवासंबंधित अधिकाऱ्यांकडून परवानगी मिळणारकशी ? हेप्रश्नगृहनिर्माण संस्थांना भेडसावू लागले साहजिकच यामुळे जुन्या इमारतीचा पुनर्विकास करणेजवळजवळअशक्यबनले

खरे तरयाभूखंडाचे खरेदीखत गृहनिर्माण संस्थेच्या नावेकरूनदेण्याची जबाबदारी हिविकासक / बिल्डरयांचीच आहे त्याने मूळमालक व गृहनिर्माण संस्थायांच्यात खरेदीखत करून देणे आवश्यक होते परंतु ते काही झाले नाही याला अनेक कारणे होतीच. त्यातील एक महत्वाचे कारण म्हणजे गृहनिर्माण संस्थेचे सभासद त्या जमिनीच्या बाजारभावा प्रमाणे मुद्रांक शुल्क भरण्यास तयार नव्हते. आता हे विधान सर्वानाच लागू होत नाही परंतु आता खर्च कशाला अशी चालढकल झाली व दैनंदिन व्यवहार अडत नसल्यामुळे हा विषय मागे पडत गेला. ज्यावेळी हा विषय ऐरणीवर आला त्यावेळी आणखी नवीनच प्रश्न उपस्थित होत गेले त्यातील महत्वाचे म्हणजे जमिनीचे मूळमालकांचे मृत्यू झाले होते. त्यांचा वारसतपास झालेला नव्हता व तो करण्यास मूळमालकांच्या वारसांना रसदेखील नव्हता. बिल्डर/ डेव्हलपर यांच्या बाबतीतही हीच परिस्थिती होती.त्यांच्या बाबतीतही मृत्यू झाले होते. भागीदारी संस्था मोडीत निघाल्या होत्या.त्यामुळे कन्व्हेयन्स डीड म्हणजेच खरेदीखत होणे अशक्यच होते त्यावर शासनाने हा डीम्डकन्व्हेयन्सचा पर्याय काढलाआणि त्यामुळे पुनर्विकासाच्या कामातील एक अडसर दूर झाला त्यानंतर डीम्ड कन्व्हेयन्सची पद्धत देखील सोपी केलीआणित्यामुळे त्याचा फायदा अनेक गृहनिर्माण संस्था घेत आहेत आणि ते चांगलेच आहे .

मात्र हे होत असताना अन्य काही प्रश्न उभे राहू लागले.आता डीम्डकन्व्हेयन्सला जायचे म्हणजे सर्व करारनामे नोंदणीकृत असले पाहिजेत अशा समाजामुळे संस्थांचे पदाधिकारी जुन्या सभासदांच्या मागे लागू लागले . तुम्ही काही करा पण तुमचे करार पत्र नोंदणीकृत करून आणा अशाप्रकारचा आग्रह धरण्यास येऊ लागला आणि मग या मूळ वा जेष्ठ सभासदांच्या मनामध्ये धाकधूक निर्माण होऊ लागली. ज्यांच्या करारनाम्यांच्याबाबतीत ज्यांनी स्टॅम्प ड्युटी भरली नव्हती त्यामुळेच जणूकाही आपल्या संस्थेचे डीम्डकन्व्हेयन्स होत नाही अशाप्रकारचा समज इतर सदस्यांचा होऊ लागला. पर्यायाने संस्थेचे काम या लोकांकडून अडवले गेले आहे असे समज पसरून संस्थेमधील वातावरण गढूळ होऊ लागले याबाबत याबाबत जाणीव व्हावी यासाठीच हालेखप्रपंच! गृहनिर्माण संस्था स्थापन झाल्या त्यावेळी निरनिराळ्या प्रकारे करारनामे करून सभासदांना ताबा देण्यात आला. कित्येक गृहनिर्माण संस्था या अगोदर स्थापन झाल्या व त्यानंतर त्या संस्थांनी आपापल्या नावे भूखंड विकत घेऊन त्यावर इमारती बांधल्या व इमारतीमधील सदनिकांचे /गाळ्यांचे वाटप सभासदांमध्ये केले. आता या बाबतीत सभासदांना ताबा देताना संस्थांनी त्यांना 'अलॉटमेंट लेटर' दिले.यांचे बाबतीत अलॉटमेंट लेटर व त्यातील तपशील हाच एक करारनामा होय आता सदर भूखंड विकत घेताना संस्थेने त्यावेळी मुद्रांक शुल्क म्हणजेच स्टॅम्पड्युटी भरली असल्यामुळे व सदर भूखंड संस्थेच्याच नावाने असल्याने या ठिकाणी कन्व्हेयन्स अथवा डीम्डकन्व्हेयन्स करण्याचा प्रश्नच उदभवत नाही कारण त्यांचे कन्व्हेयन्स म्हणजेच खरेदीखत पूर्वीच झालेलेआहे

कित्येक लोकांनी त्यावेळेला बिल्डरकडून सदनिका खरेदी केल्या होत्या त्यापैकी काही जणांचीकरारपत्रे हि नोंदवली होती तर काही जणांची करारपत्रे ही नोंदलेली देखील नव्हती. एवढेच काय पण जमी नमालक व विकासक यांच्यातील विकासकरारनामे देखील नोंदलेले नव्हते तरी देखील त्याठिकाणी इमारत बांधण्यास स्थानिक स्वराजसंस्थानी परवानगी दिली व इमारती उभ्या राहिल्या. आता अशाप्रकारे ज्या गृहनिर्माण संस्था या नोंद झाल्या त्यातील सदस्यांची अग्रीमेंट हि नोंद केलेली नाहीत तसेच काही सदस्यांनी आपले करारनामे नोंद केले आहेत ते करारना मे देखील रु.५ अथवा रु. १०/- च्या स्टॅम्पपेपरवर केले गेले आहेत.अशा सदस्यांना संस्था अथवा संस्थेचे पदाधिकारी हे आपले करारनामे नोंद करून



घ्यावा व आपण आता मुद्रांकशुल्क भरा.अशाप्रकारचा तगादा लावत आहेत . परंतु त्याची काहीही जरूर नाही असे आमचे मत आहे.

**याचे कारण म्हणजेप्रत्येक गृहनिर्माण संस्थांनी पुढील गोष्टी या विचारात घेणे आवश्यक आहेत त्या अशा :-**

1)कोणताही करारनामा हा१२०दिवसानंतर नोंदच होत नाही त्यामुळे अगदी आत्ताच्या बाजारभावाने स्टॅम्पड्युटी भरली तरी सुद्धा ते करारनामे नोंद होणारच नाहीत
2)हीसारीअग्रीमेंटस हीसाधारण१९७०ते१९८५-८८ च्या दरम्याने झालेलीआहेतत्यावेळी स्टॅम्पड्युटी हाप्रकारचा नव्हतात्यामुळे त्यावेळी ज्यास्टॅम्पपेपरवर करारनामे नोंद झाले तेच मुद्रांक शुल्क समजलेगेले
3)महाराष्ट्र शासनाने स्टॅम्पड्युटी संबंधीचे विधेयक मंजूरकरून पूर्वलक्षीप्रवाहाने लागू केले त्या कालावधीत ज्यांची अग्रीमेंटस त्यांना संबधीतमुद्रांकशुल्क कार्यालयातून नोटिसा गेल्यात्यांनी भरले
4)काही करारनामे नोंद करताना करारनामे करणारे पक्षकार वरजिस्टार यांच्यात स्टॅम्प ड्युटी काढण्यावरून वाद झाले तेव्हा संबंधित रजिस्टारानी त्या करारनाम्यावर 'इम्पॉउंडेड' असा शिक्का मारून करारनामे नोंद करून घेतले त्यांना देखील कमी भरलेले मुद्रांक शुल्क भरावे लागले.
5)मध्यंतरीच्या काळात ज्याअभययोजनाशासनाने जाहीर केल्या त्यात देखील वर दर्शवलेल्या कालावधीमध्ये झालेले करारनामे स्विकारण्यात आले नाहीत. ज्यांनी या योजनेचा लाभ घेतला त्यांचे मुद्रांक शुल्क स्वीकारले गेले परंतु ते करारनामे काही नोंद झाले नाहीत.

या सर्वगोष्टीविचारात घेतल्यावर ज्यांचे करारनामे नोंद झालेले नाहीत.परंतु ते गृहनिर्माण संस्थेचे सदस्य बनले आहेत किंवा ज्यांचे करारनामे पूर्वी नोंद झाले आहेत व ते गृहनिर्माण संस्थेचे सदस्य आहेत. अशा लोकांवर मुद्रांक शुल्क भरण्याची सक्ती करण्याची जरुरी नाही हे याठिकाणी लक्षात घेतले पाहिजे आता तर करारनामा नोंदणीकृत असल्याशिवाय संस्था त्या खरेदीदाराला सदस्य करून घेत नाही किंबहुना तशा प्रकारची तरतूदच आता उपविधीमध्ये केली गेली आहे

मग अशासदस्यांचे मुद्रांकशुल्क भरल्याशिवाय अथवात्यांचे करारनामे नोंदकेल्याशिवाय आपल्यासंस्थेचे 'डीम्डकन्व्हेयन्स' होणारच नाही हा समज संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मनातून काढून टाकला पाहिजे संस्थेने डीम्डकन्व्हेयन्सची प्रक्रिया चालू केल्यानंतर आवश्यक त्याबाबींची पूर्तता झाल्यावर संबंधित जिल्हानिबंधक त्यांना एकतर्फी खरेदीखत करण्यायोग्य हे प्रकरण असल्याचा दाखला देतो त्यानंतर सदर प्रकरण हे अज्युडिकेशनसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवले जाते.त्यानंतर या प्रकरणात किती मुद्रांक शुल्क भरावे लागेल हे त्या कार्यालयातून कळवले जाते व कोणत्या सदनिकेचे मुद्रांक शुल्क भरलेले नाही अथवा कमी भरलेले आहे हे लक्षात घेऊन त्याप्रमाणे संबंधित अधिकारी मुद्रांकशुल्क भरण्यास सांगतात व त्याप्रमाणे मुद्रांक शुल्क भरल्यानंतरच एकतर्फी खरेदीखत म्हणजेच ज्याला डीम्डकन्व्हेयन्स म्हणतात त्याची नोंदणी होते .हि सारी पद्धत लक्षात घेतल्यास आपल्याला खात्रीशीरपणे म्हणता येईल कि या ठिकाणी मुद्रांकशुल्क हे चुकवता येत नाही अथवा मुद्रांकशुल्क भरले नाही म्हणून डीम्डकन्व्हेयन्सची प्रक्रिया चालूच होत नाही असे होतनाही थोडक्यात डीम्डकन्व्हेयन्स करण्यापूर्वी जुन्या सदस्यांना अथवा ज्यांना संस्थेने सदस्य करून घेतलेले आहे अशा सदस्यांना स्टॅम्पड्युटी भरण्याचा तगादा लावण्याचे कारणचनाही

कित्येक डीम्ड कन्व्हेयन्समधील जुन्या करारनाम्यांना साधारण (१९७० -८०च्यादरम्याने) स्टॅम्पड्युटी भरावी देखील लागलेली नाही अशी कित्येक उदाहरणे आहेत. अर्थात प्रत्येक प्रकरण हे वेगवेगळे असते. त्यामुळे कदाचित त्यांना मुद्रांकशुल्क न भरायला लागण्याची कारणे देखील वेगळी असू शकतील . त्याला नक्की काय कारण आहे हे आपल्याला समजणे अवघड आहे.

या साऱ्या पार्श्वभूमीवर ज्या संस्थांना डीम्डकन्व्हेयन्स करून घ्यायचे आहे अशा संस्थांनी सर्व सदस्यांना कळवून ठेवावे कि जर त्यांच्या सदनिकेच्या अनुषंगाने काही मुद्रांक शुल्क भरणे गरजेचे असल्यास ते संबधित सदस्याला भरावे लागेल परंतु त्यांनी मुद्रांक शुल्क भरले नाही म्हणून आपले डीम्डकन्व्हेयन्सचे प्रकरण सादर करणे थांबवू नये.

हे सारे सुचवायचे कारण म्हणजे एखाद्या सदस्याला खरोखर मुद्रांकशुल्क भरावे लागणार असेल तर ते अज्युडिकेशनच्या वेळी समजणारच आहे व त्यावेळी त्याला ते भरावे देखिल लागणार आहे. त्यामुळे शासनाचे नुकसान होण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही. मात्र घाईघाईने संस्थेचे पदाधिकारी सांगतात म्हणूनएखाद्या सदस्याने आपला वैयक्तिक करारनामा अगोदरच अज्युडिकेशनसाठी सादर केला व त्याला लागू नसेल तरीसुद्धा मुद्रांकशुल्क भरण्यास सांगण्यात आले व ते त्याने भरले तर त्या सदस्याचा तोटाच होण्याची शक्यता आहे आणि शासनाकडे एकदा भरलेले पैसे परत कधी मिळतील याची शाश्वती नसते.किंबहुना ते जादा भरलेलं मुद्रांक शुल्क वसूल करण्याचा खर्च देखील खूप येतो. शिवाय मनस्ताप होतो. वातावरण दूषित होते तो भाग वेगळाच.

**म्हणूनच एखाद्या गृहनिर्माण संस्थेला आपली डीम्डकन्व्हेयन्सची प्रक्रिया सुरु करायची असेल व संस्थेचे सदस्य असणाऱ्यानी त्यांच्या सदनिका/ मालमतेचे मुद्रांक शुल्क भरले आहे कि नाही याची खात्री नसली तरीसुद्धा त्यांच्यावर आगाऊ मुद्रांक शुल्क भरण्याची सक्ती करू नये किंवा त्यांनी मुद्रांक शुल्क न भरल्याने आपले डीम्डकन्व्हेयन्सची प्रक्रिया सुरु होणारच नाही हा गैर समज दूर व्हावा या साठीचा हा छोटासा प्रयत्न ! इतिलेखन सीमा !**

# एकतरी वारी अनुभवावी !



जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई
संपर्क करा. ९६६४५५९७८०

अदृश्य भगवंताच्या अस्तित्वाचा एक भक्कम पुरावा म्हणजे पंढरपूर ! वैकुंठभुवनाच्या आधीपासून पंढरपूर अस्तित्वात आले. त्यामुळे पृथ्वीवरील सर्वांत पुरातन तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूरचा उल्लेख केला जातो. त्यासंदर्भात एक ओवी आहे, आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी । संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात, जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर ! पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. अशी थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे. पृथ्वीवरी तीर्थे असती अपार । परी पंढरीची सर । एकाही नाही ॥ असा दाखला संत नामदेव महाराज देतात, तर न करी आळस । जाय पंढरीशी । अवघी सुखराशी । तेथे आहे ॥, असे संत चोखामेळा यांनी म्हटले आहे. काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळींचे माहेरघर असल्यानेच अवघी दुमदुमली पंढरी । भगव्या पताका खांद्यावरी । तुळशी वृंदावन डोक्यावरी । भाव भुकेल्यांची ही वारी ।, असे म्हटले जाते.

संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. तेव्हापासून चालू असलेल्या वारीमुळे पंढरपुरातील श्री विठ्ठलाची मूर्ती जागृतावस्थेत आली आहे. वारकरी राम कृष्ण हरी । असे नामसंकीर्तन सतत करत पंढरीस जातात. कलियुगात ईश्वराची कृपा संपादन करणाऱ्या एका व्यक्तीपेक्षा सर्व मिळून जेव्हा कृपा संपादनाचा प्रयत्न करतात, तेव्हा ती समष्टी साधना होते. वारीमध्ये व्यष्टीसह समष्टी साधनाही होते आणि सर्व जिवांच्या उद्धारासाठी विठ्ठलाला पंढरपुरात भूतलावर यावेच लागते. या तीर्थाचा महिमाच असा आहे. येथील भक्तांच्या तळमळीमुळे विठ्ठलाला पंढरपुरात यावेंच लागते. पंढरपूरच्या वारीने आपल्या जीवनात भक्तीचा अखंड झरा पाझरू लागतो. भावभक्तीचे बीज प्रत्येकाच्या अंतर्मनात रुजवणारी ही वारी पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच चालू रहाणार आहे. भक्तांच्या संकटसमयी धावून येण्यासाठी, आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी विठ्ठल पंढरपुरात उभा आहे. देव भावाचा भुकेला आहे, याची प्रचीती घ्यायची असल्यास पंढरपूरला जावे. शिस्तीचे दर्शन हे पालख्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. प्रत्येक दिंडीची रचना ठरलेली आहे. प्रारंभी भगवे ध्वजधारी वारकरी, मग तुळशी-वृंदावन घेतलेल्या महिला, त्यामागे टाळकरी, नंतर विणेकरी अशीच सर्व दिंड्यांची रचना असते. टाळ वाजवणाऱ्या वारकऱ्यांचा पदन्यासही लयबद्ध असतो. भले टाळकरी-वारकरी शेकडोंच्या संख्येने का असेना ! वैयक्तिक जीवनातील अभिनिवेष बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी ! श्रीक्षेत्र आळंदी आणि देहू येथून निघणाऱ्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज अन् जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या म्हणजे महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभव ! ऊन-पावसाची तमा न बाळगता भगवी पताका खांद्यावर घेऊन टाळ-मृदुंगाचा गजर करत चालणारे वारकरी म्हणजे भावभक्तीचेच प्रतीक ! कोणाच्याही तोंडवळ्यावर चिंता नाही कि मुक्कामाच्या ठिकाणी सोयीसुविधांची अपेक्षा नाही. वारकऱ्यांना प्रतिदिन १० ते २० किलोमीटरचा टप्पा चालत पार करावा लागतो. सकाळी लवकर मार्गस्थ व्हावे लागते. अल्पाहार आणि महाप्रसादही वाटेतच घ्यावा लागतो. सायंकाळी विलंबाने मुक्कामाच्या ठिकाणी पोचल्यानंतर भजन-कीर्तन होऊन दिवसाची समाप्ती होते.विठुमाऊली तू माऊली जगाची । माऊलीच मूर्ती विठ्ठलाची, विठ्ठला मायबापा ॥ असा वारकऱ्यांचा पंढरीच्या विठुरायाप्रती असलेला भाव जगात सुविख्यात आहे. विठ्ठल विठ्ठल, जय हरि विठ्ठल, असे विठ्ठलाला आळवत वारकरी प्रतिवर्षी वारीला जातात आणि परत आल्यावर स्वतःपुरतीच नव्हे, तर परिसरातही विठ्ठलाची उपासना करतात. वर्षभर प्रपंचात म्हणजेच मायेत गुंतलेल्या जीवाला वारीमार्गात येणारे अनुभव आणि अनुभूती जीवनाचे सार सांगून जातात. वारीच्या अंतिम चरणी जेव्हा पांडुरंगाचे दर्शन घडते तेव्हा तो अनुपम्य सोहळा कधीच संपू नये असे वाटते. ज्या क्षणी जीव शिवाचे मिलन घडते तो क्षण स्वर्गीय आनंदाचा अनुभव देतो. एरव्ही आरामदायक चारचाकीतून प्रवास करून पंढरपूरला जाणे आणि वारीत सहभागी होऊन माउलीला भेटणे यातील भेद वारकरीच सांगू शकतो. या भेटीला कोणत्याही ऐहिक सुखाची सर नाही. हा आनंद जीवनात एकदा तरी घ्यावा. प्रत्येकाने आयुष्यात एक तरी वारी अनुभवावी. (संदर्भ : सनातन डॉट ऑर्ग)

झाल्यावर इमारत आणि बिल्डिंग ही गृहनिर्माण संस्थेच्या मालकीची होते. त्यातील एखादी सदनिका विकली गेली व एखादा सदस्य बदलला तरी गृहनिर्माण संस्थेच्या मालकी हक्कांमध्ये काही फरक होत नाही. अपार्टमेंटच्या बाबतीत प्रत्येक अपार्टमेंट धारकाला त्या अपार्टमेंटचा पूर्ण मालकी हक्क प्राप्त होतो.

३) अपार्टमेंट मधील अपार्टमेंट धारकांची असोसिएशन स्थापन

पाप पुण्याचं काय?इथे नसेल हिशोब, पण तो विधाता नसेल डोळे बंद करून बसलेला. आपण एखाद्याला त्रास द्यायचाच म्हटलं तर नक्की देऊ शकतो. त्याचं न भरून येणारं नुकसानही करू शकतो पण आज या कलियुगात कर्माची फळं इथेच भोगावी लागतात याचीही जाणीव ठेवावी लागते. दुसऱ्याच्या मुलांचं नुकसान करताना ती वेळ आपल्या मुलांवर आली तर काय? याचा विचार कधी होणार? फक्त मी चांगला आणि दुसरे वाईट असे आपण का भासवावे? प्रेम देऊ आणि घेऊ आणि हे जग सुंदर आहे त्याहून अधिक सुंदर बनवू असं का नाही वाटत? कोणताच माणूस परिपूर्ण नसतो. प्रत्येकाचीच चूक होत असते म्हणून काही तो गुन्हेगार ठरत नाही. पण दुर्दैवानं आज प्रत्येकजण दुसऱ्याच्या चुका शोधण्यात गर्क आहे. त्याने फार मोठं पाप केलं आहे असे समजून त्याची अशी काही बदनामी होते की समोरचा माणूस कोलमडून पडतो. काहींच्यात ते पचवण्याची ताकद असते तर काहींच्यात ती नसते. कुणाच्या तरी सांगण्यावरून आपण दुसऱ्याबद्दलची आपली मतं तशीच वाईट करणं चुकीचंच. पण काय करणार? सांगणारा स्वार्थ

# देवा, वाईट चिंतणाऱ्यांचाही भलं कर!

मनाचिये गुंति...



सुभाष भाऊ चोपडे,
पाचल, ता. राजापूर.

प्रत्येक माणूस जन्माला येताना रिकाम्या हाताने येतो आणि मरणानंतर रिकाम्या हातानेच जातो. पण या मधल्या काळात आपल्या कर्माने माणूस सर्व काही मिळवतो आणि सर्व काही गमावतोही. माणसाची ओळख त्याच्या गुणांनी होते. त्याच्या त्यागाने, कष्टाने किर्तीचा कळस गगनाला भिडण्याचा प्रयत्न करत असतो. प्रत्येकाच्या कर्मावर पाप-पुण्य अवलंबून असते. काहींना मान-सन्मान मिळतो तर काहींना तो मिळतंच नाही. मी कुणाचे वाईट केले नाही पण माझेही वाईट होऊ नये अशी प्रत्येकाचीच इच्छा असते. दुर्दैवाने आज या विचारांना तिलांजली दिली जातेय याचे खूप वाईट वाटतेय.

आज माझं भलं होत नाही ना मग दुसऱ्याचीही होता कामा नये ही वृत्ती बळावली. एखाद्याची किर्ती पसरते, कारण त्याच्या मागे त्याचे कष्ट असतात. पण त्याच्यावर जळणाऱ्यांची संख्याही त्याच पटीने वाढते. सृष्टीचा नियमच आहे की, फळाफुलांनी बहरलेल्या झाडावरच दगड मारले जातात. पण दगड मारणाऱ्या हातांना त्या मुक्या झाडाच्या जखमा का दिसत नाहीत ? ज्याने दुसऱ्यासाठी फळं, फुलं दिली हा त्याचा गुन्हा होऊ शकतो का? तसं चांगलं कार्य करणाऱ्या माणसाचाही माणसं तिरस्कार का करतात ? प्रत्येक क्षेत्रात आज अशा विचारांची बांडगुळं फोफावताना दिसत आहेत. मला कुणाचं चांगलं नाही करता येत. मग वाईट तरी का करावं कुणाचं ? पद, पैसा, प्रसिद्धी, मानमरातब ह्या क्षणभंगुर गोष्टी आहेत. पण चिरकाल टिकतो तो माणुसकीचा धर्म. द्वेषाने द्वेष वाढतो तर प्रेमानं जगही जिंकू शकतो. रिकाम्या हाताने जन्मलेल्या माणसाने द्वेष, मत्सर, राग, लोभ, स्वार्थीपणा ह्या स्वतःच्या कर्माने कमावलेल्या कुप्रवृत्ती आहेत. आज दुसऱ्याचं वाईट चिंतताना, दुसऱ्याच नुकसान पाहताना नक्की आनंद मिळेल. पण आयुष्यात कमावलेल्या पाप पुण्याचं काय?इथे नसेल हिशोब, पण तो विधाता नसेल डोळे बंद करून बसलेला. आपण एखाद्याला त्रास द्यायचाच म्हटलं तर नक्की देऊ शकतो. त्याचं न भरून येणारं नुकसानही करू शकतो पण आज या कलियुगात कर्माची फळं इथेच भोगावी लागतात याचीही जाणीव ठेवावी लागते. दुसऱ्याच्या मुलांचं नुकसान करताना ती वेळ आपल्या मुलांवर आली तर काय? याचा विचार कधी होणार? फक्त मी चांगला आणि दुसरे वाईट असे आपण का भासवावे? प्रेम देऊ आणि घेऊ आणि हे जग सुंदर आहे त्याहून अधिक सुंदर बनवू असं का नाही वाटत?

कोणताच माणूस परिपूर्ण नसतो. प्रत्येकाचीच चूक होत असते म्हणून काही तो गुन्हेगार ठरत नाही. पण दुर्दैवानं आज प्रत्येकजण दुसऱ्याच्या चुका शोधण्यात गर्क आहे. त्याने फार मोठं पाप केलं आहे असे समजून त्याची अशी काही बदनामी होते की समोरचा माणूस कोलमडून पडतो. काहींच्यात ते पचवण्याची ताकद असते तर काहींच्यात ती नसते. कुणाच्या तरी सांगण्यावरून आपण दुसऱ्याबद्दलची आपली मतं तशीच वाईट करणं चुकीचंच. पण काय करणार? सांगणारा स्वार्थ साधत असतो आणि ऐकणारा आंधळा विश्वास ठेवत असतो. पण ज्याला भोगावं लागतं ना, त्याची अवस्था मात्र वाईट होते. काहीवेळा तो खचून जातो, तर काहीजण त्यातच स्वतःचं बरं वाईट करून घेतात. नियती कधी कुणासाठी थांबत नाही. ती कुणाचे लाडही करत नाही आणि वाईटही करत नाही. ती सोडून देते त्या माणसाच्या कर्मावर. त्यावर तिची दिशा ठरते आणि तसेच वागते. माझ्या निरक्षर आईने मला एक शिकवण दिली आहे की, कधी कुणाचं मन दुखावू नकोस. तिच्या या शिकवणीने मी खूप माणसं कमावली. खूप प्रेम मिळवलं. आजही मला सगळ्यापेक्षा माणसं प्रिय आहेत. मला ती हवी आहेत. पण प्रत्येकाच्या आयुष्यात चढउतार हे असतातच. का कुणास ठाऊक, पण मी ठरवलंय, आपल्यापासून कुणाला दुःख होता काम नये. कुणाचं वाईट होऊ नये असंच आपण वागायचं. मी असा वागत असताना माझं कुणी वाईट चिंतत असेल, मला त्रास देण्याचा प्रयत्न करत असेल, माझ्याबद्दल गैरसमज करून घेत असेल तर परमेश्वरा त्याला नाराज करू नकोस. कारण माझ्या वाईटामुळे त्याला आनंद, समाधान मिळणार असेल तर नक्की त्याच्या मनासारखे होऊ द्या. पण माझे वाईट होताना ते दुःख पचवण्याची ताकद, सहन करण्याची सहनशीलता मात्र मला द्यायला विसरू नकोस. वाईट चिंतनाऱ्या व्यक्तीच भलं कर, त्याच्या आयुष्यात त्याला सुख समाधान लाभू दे. त्याच्या मुलाबाळांना सुखी ठेव. मी पण त्यांच्यासारखाच वागलो तर त्याच्यात आणि माझ्यात काय तो फरक? कावळ्याच्या शापाने गाय जरी मरत नसली तरी शाप देणंही वाईटच.

देवा! माझ्या मनात कधीही वाईट विचार येऊ देऊ नकोस. माझ्या हातून वाईट घडू देऊ नकोस. सर्वांशी प्रेमाने वागण्याची बुद्धी दे. मी सर्वांशी चांगलं वागण्याचं ठरवतोय. पण तू मात्र माझं वाईट चिंतणाऱ्यांचही भलं कर!

# शास्त्रांची उपयोजकता - ज्योतिष व वास्तु

## अध्यात्म



ज्योतिर्विद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

**(मागील भागावरून पुढे...)**

वेदवाङ्मय हा हिंदू धर्माचा मुलाधार आहे. निखळ परमार्थ प्राप्त करून देणाऱ्या अध्यात्मशास्त्राचा आणि जीवनात उन्नती घडवणाऱ्या कर्मयोगाचा उत्तम मेळ वेदांमध्ये दिसून येतो. उपनिषदांमधून अध्यात्मशास्त्र विशद केले गेले आहे आणि यज्ञप्रक्रियेला महत्त्व दिले गेले आहे. यज्ञप्रक्रियेला महत्त्व देण्याचे कारण, मानवी जीवनाचे साफल्य घडवून आणणाऱ्या कर्मयोगाचा विस्तार या यज्ञप्रक्रियेद्वारे झाल्याचा ग्रंथांमधून उल्लेख आहे. यज्ञप्रक्रियेबाबत ब्राह्मणग्रंथ, सूत्रग्रंथ तसेच अलीकडच्या काळात ब्रह्मकर्मसमुच्चय या ग्रंथात विशेष सांगितले असल्याचे ' शास्त्र असे सांगते ' या ग्रंथात उल्लेखित आहे.

कोणताही यज्ञ करावयाचा झाल्यास त्यासाठी सुयोग्य असा काळ पहावा लागतो. अशावेळी काळाच्या
१) तिथी, २) वार, ३) नक्षत्र, ४) करण आणि ५) योग या पाच अंगांचा अर्थात ' पंचांगांचा ' शुभकाळ जाणून घेण्यासाठी विचार करावा लागतो.

ज्योतिषशास्त्रामुळे या पाच अंगांचा तसेच काळाशी संबंधित
१) जल, २) अग्नी, ३) वायू , ४) पृथ्वी व ५) आकाश ही पाच तत्वे आणि
१) तम, २) रज व ३) सत्व हे तीन गुण यांचे यथार्थ ज्ञान होत असल्यामुळे ज्योतिषशास्त्र हे वेदांचेच एक अंग आहे.

**' वेदस्य निर्मलं चक्षुर्ज्योतिः। वेदस्य चक्षुः किल शास्त्रमेतत्॥ '**

अर्थात ज्योतिषशास्त्र हे ' वेदचक्षु ' आहे. वेदांचे ज्ञान डोळस करणारे शास्त्र हे ज्योतिष शास्त्र आहे. ज्योतिषशास्त्र हे ' कालज्ञान " शास्त्र आहे आणि ' काळ म्हणजे परमेश्वर ' आहे हे आपण यापूर्वीच्या भागातून जाणून घेतलेले आहे. काळाबाबत, परमेश्वराबाबत यथार्थ ज्ञान देणारे शास्त्र हे ज्योतिषशास्त्र आहे.

ज्योतिष शास्त्राचे तीन प्रमुख विभाग आहेत ते म्हणजे
१) सिद्धांत, २) संहिता आणि ३) होरा.

१) सिद्धांतामध्ये ग्रह गणिताचा अभ्यास असतो. यामध्ये ग्रहांची गती, स्थिती त्यानुसार होणारी संवत्सरे, अयने, मास, ग्रहण तसेच कालगणना इत्यादींचा अभ्यास असतो. सिद्धांतांच्या अंतर्गत पंचांगांबाबत विचार असतो.
2) संहितेमध्ये बारा राशींमधून होणारी ग्रहांची भ्रमणे त्याचप्रमाणे होणाऱ्या ग्रहांच्या युत्या, धूमकेतू, ग्रहणे, उल्कापात, ग्रहांचे होणारे विविध योग, ग्रहांचे शत्रू-मित्रत्व यांचा जागतिक भविष्यावर होणारा बरा-वाईट अर्थात शुभ-अशुभ परिणाम यांचा अभ्यास असतो.
3) ज्योतिषशास्त्राच्या होरा या भागात मनुष्याच्या जन्मकाली असलेल्या ग्रहस्थितीवरून, जन्म कुंडली वरून त्याच्या आयुष्यात घडणाऱ्या सुखद व दुःखद घटनांचा मागोवा घेतला जातो, अभ्यास केला जातो. याव्यतिरिक्तही अनेक विषय ज्योतिषशास्त्रात अंतर्भूत आहेत.




वास्तविक पाहता ज्योतिषशास्त्राचा विस्तार प्रचंड आहे. त्यावर संशोधनात्मक व अभ्यासपूर्ण असे अनेक लहान, मोठे ग्रंथ उपलब्ध आहेत. धर्मशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र हे परस्पर भिन्न असले तरीही मानवी जीवनात व्यवहारात त्यांचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध येतच असतो उदाहरणार्थ, धार्मिक कार्यात मुहूर्त शोधताना काळाचे शुभाशुभत्व जाणण्यासाठी ज्योतिष शास्त्राचा आधार घेणे अपरिहार्य ठरत असते. जन्म आणि मरण या दोन बाबी आपल्या हाती नसल्या तरी या दोघांच्या दरम्यान जे जीवन आहे त्या जीवनाबाबत विचार करणे, चिंतन करणे हे आपल्या हाती आहे.

ज्योतिष शास्त्राचेही ' ज्योतिष (खगोलीय) ' आणि ' फलज्योतिष ' असे प्रकार आहेत. या दोन प्रकारांमध्ये फार फरक आहे जसा की, रसायनशास्त्र (Chemistry) आणि किमयाशास्त्र (Alchem) यामध्ये फरक आहे. ज्योतिष अर्थातच अवकाश ज्योतिष किंवा खगोलीय ज्योतिष (Astronomy) यामध्ये आकाशातील ग्रह, तारे व नक्षत्र तसेच इतर तारकापुंज यांच्या स्थितीचा, गतीचा अभ्यास असतो. यातील निष्कर्ष वेधशाळेच्या निष्कर्षांशी तंतोतन मिळते-जुळते असतात. त्यामुळे हे शास्त्र तंतोतंत असल्याचे स्वीकारले जाते. खगोलीय ज्योतिष शास्त्राची मानवी बाह्य इंद्रियांच्या सापेक्ष (भौतिक) सिद्धता प्रमाणित होत असते. ह्याउलट फलज्योतिषशास्त्र (Astrology) यामध्ये ग्रह, तारे, नक्षत्र ... वगैरेंच्या हालचालींचा मानवी जीवनावर होणारा परिणाम हा अंतर्दृष्टीने, अतिन्द्रियांच्या सापेक्ष अर्थात दिव्यशक्तीच्या आधारे ठोकताळे विचारात घेऊन निष्कर्ष काढले जातात. या निष्कर्षांच्या अनुभूतीसाठी अतिंद्रिये कार्यक्षम असावी लागतात अन्यत: सर्वसामान्य जनांना कालांतराच्या अनुभवाने निष्कर्षाची सत्यता वा असत्यता प्रचितीस येते.

वास्तुशास्त्रात फलज्योतिषशास्त्राचा आधार घेतलेला आहे. कर्त्या व्यक्तीच्या कुंडलीनुसार राहत्या वास्तूमध्ये काही फेरबदल केल्याने लाभ होत असल्याची प्रचिती येत असते.

सारांशाने वास्तुशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र यांतून व्यवस्थापनाने आध्यात्मिक आणि आधिभौतिक स्थैर्य साधता येते आणि स्थैर्य साधल्यानंतर उत्कर्षाकडे वाटचाल करता येते.

**॥ श्री कालार्पणमस्तु॥**

## तिचा गौरव



चित्रा अविनाश नानिवडेकर,
सफाळे- पालघर.
मो. 9969669523

# उर्वी- एक ओजस्विनी! (सत्यकथा)

असं मानतात प्रत्येक मुलीं मध्ये काही प्रमाणात देवीचा अंश असतो. वेळ आल्यावर ती दुर्गा, चंडिका, काली,मोहिनी, लक्ष्मी... अशी असंख्य रूपं धारण करते.

**गोरेगावच्या डॉ.उर्वी सुनील जंगम ही तरुणी अशाच एका स्त्रीशक्तीचं रूप म्हणावं लागेल.**

प्रीमॅच्यूर बेबी म्हणून अवघ्या सहाव्या महिन्यात जन्माला आली. तिच्या आईवडीलांना हा धक्का पचवताना आपल्या मुलीच्या भविष्याबद्दल काळजी होतीच. परंतू तिचे वडील श्री.सुनील जंगम आणि आई शुभाताई ह्यांनी कंबर कसली. तज्ञ डॉक्टर्स च्या भेटीतून फक्त एकच आशेचा किरण मिळाला की अमेरिकेत गेल्यास इलाज होऊ शकेल. तीन वेळा जाऊन सुद्धा फक्त प्रकाश पाटलावर इलाज झाला. मग मात्र दोघांनी तिच्या सर्वांगीण विकासावर भर दिला.

आईने उच्च शिक्षणा पर्यंत तिच्या सगळ्या विषयांच्या आपल्या आवाजात कसेट्र तयार करून तिला शिकवलं, तर वडिलांनी तिला परिससरातील सर्व वातावरणाचा आस्वाद, निसर्गाशी, प्राणी पक्षांशी ओळख हया बद्दल डोळस जागरूकता निर्माण केली.एवढंच नाहीतर आपल्या मुलीच्या वैगुण्यावर विजय मिळवण्याचा चंग बांधून तिला हॉर्स रायडींग, मल्लखांब, बिमवर चालणं सगळं शिकवत गेले.लहानपणी जिमनेस्टिक, मैदानी खेळ इतर सामान्य मुलांबरोबर खेळताना तिने आपल्यातील "श्रवण तंत्रचा अचूक वेध घेणे "हा मंत्र आत्मसात केला. त्याचा उपयोग दैनंदिन जीवनात करत तिने आपल्या वैगुण्यावर मात मिळवली. तसंच शालेय शिक्षणात अनेक बक्षीस मिळवत पार पाडलं. पाटकर महाविद्यालयात11वी 12वी केली. इंग्लिश लिटरेचर आणि इतिहास हे विषय घेऊन उर्वीने आपले उच्च शिक्षण B.A. फर्गयुसन कॉलेज मधून पूर्ण केले.त्याचबरोबर जर्मन भाषेच्या मॅक्सम्युलर च्या सात लेव्हल पास केल्या. ह्याचाच अर्थ ती आता डबल ग्राज्यूएट M.A झाली होती. हा मानाचा तुरा मिळवताना तिला झालेले कष्ट आणि त्यावर तिने आपल्या दिव्यांगावर केलेली मात हे बघता तिच्यातील असामान्य अद्वितीय शक्तीचा अभिमान वाटतो.आई वडिलांच्या अथक मेहनतीन.आणि स्वतः च्या जिद्दीने तिने हे यश मिळविले.



डॉ.उर्वी सुनील जंगम

एवढ्या यशावर थांबणं हे उर्वी सारख्या प्रचंड उर्जेने भरलेल्या मुलीसाठी अशक्य होतं. जर्मन भाषेत "माईन व्हर्ट "अर्थात "माय व्हॅल्यू "हा आपला निबंध सादर करून तिने चार महिन्याची जर्मन ची स्कॉलरशिप मिळवली.. तेवढ्यावरच न थांबता तिने आपलं उद्दिष्ट अजून वाढवत Ph.D. साठी जर्मन भाषेतून ""अस्थेटिक्स ऑफ नॉन व्हिज्युअल "अर्थात "अदृश्य रसास्वाद "असा हटके विषय निवडला. हया साठी तिला भारतात अभ्यासाला साधनं अपूर्ण पडली. पण आपल्या जिद्दीच्या जोरावर तिने पुन्हा जर्मन अकॅडमि एक्सचेंज अंतर्गत 4 वर्षांची शिष्यवृत्ती मिळवली आणि "ग्योटिंगो विद्यापीठाच जर्मनी "ची डॉक्टरेट मिळवली.

आज मोठ्या अभिमानाने डॉ. उर्वी ह्यांचं नांव "जर्मन स्टडीज् मध्ये डॉक्टरेट मिळविलेली पहिली महिला."म्हणून घेऊन घेतो. आणि भारताची शान उंचवू शकतो. ह्या यशाने हुरळून न जाता उर्वी ने आपल्या देशात आपल्या परिसरात राहून काम करयचं ठरविले. गोरेगाव परिसरात तिने 'Asthesis Foundation For Visually Impaired ' हया नावाचं इन्स्टिट्यूट काढलं. आपण ज्या त्रासातून गेलो त्या त्रासातून आपल्या सारख्या इतर मुलांना जाऊ देऊ नये हया उद्देशाने काढलेल्या हया संस्थेचे विद्यार्थी आज खूप आत्मविश्वासाने समाजात वावरतात. त्यातील प्रत्येकजण डॉ. उर्वी च्या कामाबद्दल भरभरून बोलत असतात. त्यांच्या मते आम्हाला इथे येऊन
1.आत्मविश्वास
2. इंग्लिश बोलण्यावर प्रभुत्व
3. भविष्यात काय करायचं ह्याचं ध्येय निश्चित करणं.
4. कॅम्पुटर ची गरज आणि ते शिक्षण
5. वेगवेगळ्या परकीय भाषा का शिकव्या ह्याचं ज्ञान
6. आपण दिव्यांग किंवा विकलांग असलो तरीही जगात कसं वावरायचं ह्याचं ज्ञान. त्या वर मात करणं.
7.कॉर्पोरेट क्षेत्रात यशस्वी होण्याच्या स्किल
असे बरेच विषय शिकायला मिळाले.

**अवघ्या 34 वर्षीय डॉ.उर्वीने काळाच्या पुढे जाऊन आपल्यासारख्या दृष्टीहीन लोकांसाठी जे जे केलं ते सगळं अद्वितीय आहे. हॅट्स ऑफ टू हर.**

## सोनेरी दुनिया



श्री. श्रीराम शेटये.
नालासोपारा.

### गोविंदा आला रे !

श्रीकृष्णा सारखाच देखणा नटखट आणि नृत्यविशारद . तरुण -तरूणींमध्ये लोकप्रिय असणारा अभिनेता म्हणजेच गोविंदा. सन १९८६ चा तो काळ मुंबईतल्या फिल्म इंडस्ट्रीवर गोविंदाचे राज्य सुरु झाले होते.'इल्जाम ' हा त्याचा पहिला चित्रपट तुफान चालला. इल्जाम आणि 'लव्ह ८६' या दोन्ही चित्रपटाच्या यशाने गोविंदा तरुणाईच्या गळ्यातील ताईत बनला होता.

या दोन्ही चित्रपटात निलम कोठारी त्याची नायीका होती. दोघांची जोडी अप्रतिम जुळली होती. कॅलिफोर्निया च्या निसर्गरम्य परिसरात जन्माला आलेली आणि तिथेच लहानाची मोठी झालेली निलम नखशिखांत सौंदर्यवती होती. गोविंदा आणि निलमची ही जोडी प्रेक्षकांच्या पसंदिस उतरली. तारूण्यसुलभ वय व एकमेकांस अनुरूप जोडी. तितकिच प्रेमकहाणी देखील तरूण प्रेक्षकांच्या हृदयाला भिडणारी होती . यामुळे गोविंदाचे चित्रपट आले की प्रेक्षक डोक्यावर घेत असत.

गोविंदा म्हटल की मग त्याच्या नृत्यकौशल्या बद्दल त्या काळात खुपच लोकप्रियता होती. एकदा तो पडद्यावर आला की च्याच्या च्या गाण्यावर आणि नृत्यावरही फिदा झालेली तरूणाई थिएटर मध्ये जल्लोशात थिरकताना दिसत असे. बघता बघता गोविंदा सुपरस्टार झाला. थिएटर मध्ये त्याच्या चित्रपटांना तुफान गर्दी होऊ लागली. गणेशोत्सव नौरात्रोत्सव अशा कार्यक्रमात गोविंदा येणार असे समजले की मुंबईत रस्त्यावर चाहत्यांची तुफान गर्दी होत असे.

त्याने 'खुदगर्ज' या चित्रपटात शत्रुघ्न सिन्हा आणि जितेंद्र यांच्यासोबतही भुमिका केली. त्यातले 'मै से मीना टीना साथी से' हे गाणे खुप गाजले. या गाण्यावर त्याचे चाहते आजही थिरकतात. हत्या, राजा बाबू, आखे, शोला और शबशम, या सारख्या अनेक चित्रपटात काम केले. गोविंदाचे आई वडील चित्रपट विश्वातीलच होते. फारच रंजक कहाणी आहे त्यांची. गोविंदाचे वडील अरुण आहुजा हे चित्रपट विश्वातील जुन्या काळातले अभिनेते, निर्माता, दिग्दर्शक होते.

गोविंदाचे वडील १९४० सालातले देखणे अभिनेते होते. गोविदांची आई देखील चित्रपट अभिनेत्री होती. लग्नानंतर गोविंदाच्या आईने चित्रपटात काम करणे बंद केले. गोविंदाचे वडील चित्रपटात काम करत राहिले परंतू दुर्दैवाने त्यांचे चित्रपट चालले नाहीत. नंतर त्यांनी चित्रपट निर्मिती सुद्धा केली. परंतू तेथेही त्यांना अपयश आले. चित्रपट निर्मिती मध्ये चित्रपट पडल्यामुळें त्यांना फार मोठे नुकसान झाले. त्यांनी इंडस्ट्री ला रामराम केला. त्यात त्यांना मुंबईतले ब्रांद्र्यासारख्या उच्चभ्रू वस्तीतले घर विकावे लागले. त्यानंतर त्यांनी विरार मध्ये चाळीत घर घेतले.

**गोविंदा सुपरस्टार झाला आणि गेलेले वैभव त्याने परत मिळविले. मुंबईत जुहू येथे घर घेतले. तोपर्यंत गोविंदा आई-वडीलांसोबत विरारच्या चाळीतच राहिला. कोणतीही शिफारस न वापरता गोविंदा स्व:ताच्या मेहनतीने चित्रपट इंडस्ट्रीत आला आणि जिंकला. एक जमाना गोविंदाचा होता. हिरो नं १' राजा बाबू, साजन चले ससुराल, हद कर दी आपने, या सारख्या चित्रपटातून त्याने विनोदी भुमिकाही केल्या. आपल्या अनोख्या नृत्यशैलीने गोविंदा आजही चाहत्यांच्या हृदयात कायम आहे.**



## पाऊले चालती, पंढरीची वाट..!

प्रा.के.एस.शिरबंदे,
दापोली.

**पाऊले चालती, पंढरीची वाट
गांजुनिया भारी दु:ख दारिद्र्याने
पडता रिकामे भक्तीचे ताट
पाऊले चालती, पंढरीची वाट.!**

"आषाढी एकादशी" हा वारकऱ्यांचा महोत्सव..! पावसाच्या पहिला थेंब पडला की सगळ्या महाराष्ट्राला आषाढी वारीचे वेध लागतात..! सारे वारकरी अभंग अथवा भजने गात विठ्ठलाचे नामस्मरण करत महाराष्ट्रातून व इतर प्रांतातूनही पंढरपूरला विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी, ऊन्हा पावसाची पर्वा न करता शेकडो मैल पायी,पायी चालत पंढरपूरात येतात..! कोणताही भेदभाव न ठेवता, सर्वधर्मसमभाव या नात्याने, या वारीमध्ये अनेक जाती धर्माचे लोक सहभागी होतात. तुकाराम, नामदेव व ज्ञानेश्वरांच्या पालख्या शेकडो मैल पायी प्रवास करून पंढरपूरला येतात आणि माऊली पांडुरंगाच्या चरणी लीन होतात..! वारकऱ्यांचा हा मेळा पाहणे एक भाग्य आहे..! लाखोंच्या संख्येने भाविक पंढरपुरात विठ्ठलाच्या दर्शनासाठी दरवर्षी आषाढी एकादशीला येत असतात..!

वर्षातून मुख्यतः चार प्रकारच्या वाऱ्या आहेत चैत्र वारी, माघ वारी, कार्तिक वारी व आषाढ वारी ! आषाढ वारी ही सर्वात मोठी वारी आहे...! या पंढरपूरच्या वारीला सध्या जागतिक महत्त्व आले आहे ,जगात कुठेही अशा प्रकारे, इतक्या मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या जाती धर्माचे , पंथाचे व बहुजन समाजाचे लोक एवढ्या श्रद्धेने व निष्ठेने एखाद्या देवाची उपासना करण्यासाठी एकत्र येताना दिसत नाहीत..! कारण पंढरपूरचा विठ्ठल हा सर्वसामान्य लोकांचा ,गोर गरिबांचा, रंजल्या गांजलेल्यांचा देव आहे !

या वारीचे वैशिष्ट्य म्हणजे, दरवर्षी बाहेरच्या देशातील लोक देखील वारीचा अभ्यास करण्यासाठी या वारीमध्ये सहभागी होतात व वारीचा अद्भुत आनंद देखील घेतात..! काही बाहेरच्या व आपल्या शास्त्रज्ञानी वारी हा विषय पिएचडी साठी घेतला आहे..! तसेच या अद्भुत वारीचे रहस्य काय आहे, हे देखील शोधण्याचा प्रयत्न चालू आहे..!

ह्या पंढरपूर वारीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, या वारीच्या दरम्यान होणारे माणुसकीचे दर्शन..!
ज्या ज्या गावात या संताच्या पालख्या व दिंड्या पोहोचतात, त्या ठिकाणी त्या गावचे लोक , संध्याकाळी वारकऱ्यांची राहण्या जेवणाची व्यवस्था करतात..! त्यादिवशी संध्याकाळी भजन व कीर्तन व प्रवचन यासारखे अध्यात्मिक व बौद्धिक कार्यक्रम केले जातात..! ते ऐकण्यासाठी गावातली सर्व मंडळी जमा होतात..! तसेच वारकऱ्यांना लागणारी सर्व प्रकारची मदत त्या गावचे सरपंच व स्थानिक लोक करत असतात...!

दुसऱ्या दिवशी परत हे वारकरी दुसऱ्या गावी प्रस्थान करतात... अथकपणे, न दमता, टाळ मृदंगाच्या तालावर त्यांचे पाऊल पंढरीच्या दिशेने पुढे पुढे जात असते,सारे काही तहानभूक हरपून..! विठ्ठल नामाच्या जयघोषात तल्लीन होऊन..! मंत्रमुग्ध होऊन..! या वारकऱ्यांना मदत करण्यासाठी वाटेवर जागोजागी, डॉक्टरांचे पथक, नाभिक, चर्मकार, मसाज करणारे हे सारे स्वयंसेवक वारकऱ्यांना विनामूल्य सेवा देण्याचे काम, ते मोठ्या भक्ती भावाने करत असतात..! त्यातून त्यांना साक्षात विठ्ठलाची सेवा केल्याचा आनंद मिळत असतो..!

या वारकऱ्यांच्या बरोबर काही मुके प्राणी देखील दिंडीमध्ये सहभागी होताना आपण पाहिले.! मागील वर्षी आपण हरिण नाचत नाचत दिंडी बरोबर चालल्याचे पाहिले व यावर्षी
वानर व खारुताई या देखील दिंडीमध्ये सहभागी झाल्याचे आपण पाहिले..! एकूणच काय तर मुक्या प्राण्यांना देखील पंढरीच्या विठुरायाची ओढ लागल्याचे दिसून येत आहे..! तर असे हे सारे वारकरी आषाढी एकादशीच्या आदल्या दिवशी पंढरपुरात पोहोचतात..! रात्रभर भजन कीर्तनामध्ये दंग होऊन, दुसऱ्या दिवशी पवित्र चंद्रभागेत स्नान करून, सकाळची काकड आरती म्हणून, विठ्ठल रखुमाईचे डोळे भरून दर्शन घेतो व तिथून निघण्यापूर्वी खालील भाव त्याच्या मनी प्रकटतात..!

देहाचे झाले मिलन,
आज आत्म्याशी..!
अवघी चिंता पांडुरंगा,
आता तुझ्या चरणाशी..!

मित्रांनो...! पंढरपूरची वारी म्हणजे महाराष्ट्राची महाउपासना आहे..! कुणीतरी म्हटले आहे की, जर आपल्याला जगण्याचा, निष्ठेचा, सेवेचा, नितांत सुंदर व उदात्त अनुभव घ्यायचा असेल तर "आयुष्यात एक तरी वारी अनुभवावी"...!

"आनंदी ठेव माझ्या कुटुंबाला
पुढच्या वारीला येतो मी पंढरीला.!

असे साकडे विठुरायाला घालून, माझा हा वारकरी मोठ्या आनंदाने व समाधानाने आपल्या घरी परततो...!

# सरकारी योजना/नोकरी

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज मेरिट शिष्यवृत्ती योजना २०२४

महाराष्ट्र सरकारने अलीकडेच दोन महत्त्वाच्या योजना जाहीर केल्या आहेत, ज्यांनी युवकांचे बेरोजगारी कमी करणे आणि मागासलेल्या समुदायांमध्ये शैक्षणिक सहाय्य वाढवणे यावर लक्ष केंद्रित केले आहे. या योजना आहेत **मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना** आणि **राजर्षी छत्रपती शाहू महाराज मेरिट शिष्यवृत्ती योजना २०२४.** या योजना कौशल्य विकास, आर्थिक सहाय्य आणि रोजगाराची संधी वाढवण्यावर भर देतात.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज मेरिट शिष्यवृत्ती योजना २०२४**

बेरोजगारी कमी करण्याबरोबरच, महाराष्ट्र सरकार मागासलेल्या समुदायांसाठी शैक्षणिक सहाय्यावर देखील लक्ष केंद्रित करत आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज मेरिट शिष्यवृत्ती योजना २०२४ ही एससी विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य प्रदान करते, जे शैक्षणिक उत्कृष्टता साध्य करतात, अशा प्रकारे या समुदायांमध्ये उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देते.

**योजनेचे प्रमुख वैशिष्ट्ये:**

1. **आर्थिक सहाय्य:** ही योजना ७५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या एससी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करते. हे आर्थिक सहाय्य शैक्षणिक खर्च कव्हर करण्यास मदत करते, ज्यामुळे आर्थिक अडचणींचा सामना न करता विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे सोपे होते.
2. **शैक्षणिक उत्कृष्टता प्रोत्साहन:** उच्च शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त करणाऱ्यांना बक्षीस देऊन, ही योजना विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासात उत्कृष्टता साध्य करण्यासाठी प्रेरित करते. ही योजना विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळवण्यासाठी आणि चांगल्या शैक्षणिक निकालांसाठी प्रोत्साहित करते.
3. **विस्तृत पोहोच:** राजर्षी छत्रपती शाहू महाराज मेरिट शिष्यवृत्ती योजना महाराष्ट्रातील एससी विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात पोहोचवण्यासाठी डिझाइन केली आहे, ज्यामुळे आर्थिक सहाय्य गरजू विद्यार्थ्यांना मिळते. ही व्यापक पोहोच संपूर्ण समुदायांचा उन्नतीसाठी मदत करते आणि सामाजिक समता प्रोत्साहन देते 【10†source】.

**परिणाम आणि महत्त्व**

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज मेरिट शिष्यवृत्ती योजना या दोन्ही योजना बेरोजगारी कमी करण्यासाठी आणि युवक व मागा देण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या बांधिलकीचे प्रतिबिंब आहेत. या योजना आर्थिक सशक्तीकरण, सामाजिक समता, युवक विकास आणि डिजिटल एकात्मतेच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण आहेत.

**आर्थिक सशक्तीकरण:**

कौशल्य प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य प्रदान करून, सरकार युवकांना चांगल्या रोजगाराच्या संधी मिळविण्यास सक्षम करत आहे. हे केवळ त्यांच्या व्यक्तिगत आर्थिक संभाव्यतेत सुधारणा करत नाही तर राज्याच्या आर्थिक विकासात देखील योगदान देतो.

**सामाजिक समता:**

एससी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सामाजिक असमानता दूर करते आणि उच्च शिक्षणाचा प्रवेश सुलभ करते. हे सामाजिक समता प्रोत्साहित करते आणि विविध सामाजिक-आर्थिक गटांमधील अंतर कमी करण्यास मदत करते.

**युवक विकास:**

युवकांचा विकास हे कोणत्याही प्रदेशाच्या दीर्घकालीन वाढी आणि स्थिरतेसाठी अत्यावश्यक आहे. या योजना युवकांना उत्पादक समाज सदस्य होण्यासाठी आवश्यक कौशल्य आणि शिक्षण देण्याचे उद्दिष्ट साधतात, ज्यामुळे अधिक मजबूत आणि गतिशील कार्यबल तयार होते.

**डिजिटल एकात्मता:**

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेसाठी समर्पित पोर्टल वापरणे हे योजनांच्या कार्यान्वयन आणि मॉनिटरिंगमध्ये तंत्रज्ञानाचा लाभ घेण्याच्या सरकारच्या प्रयत्नांचे उदाहरण आहे. ही डिजिटल एकात्मता पारदर्शकता आणि सर्व सहभागींसाठी प्रवेशयोग्यता सुनिश्चित करते.

**निष्कर्ष**

महाराष्ट्र सरकारच्या अलीकडील उपक्रम, मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज मेरिट शिष्यवृत्ती योजना २०२४, बेरोजगारी कमी करण्यासाठी आणि मागासलेल्या समुदायांमध्ये शिक्षणाला समर्थन देण्यासाठी स्तुत्य पाऊल आहे. या योजना केवळ तात्काळ आर्थिक मदत आणि कौशल्य विकासाच्या संधी प्रदान करत नाहीत, तर राज्याच्या दीर्घकालीन आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठी पाया घालतात. युवकांमध्ये गुंतवणूक करून आणि शिक्षणाचा समतोल प्रवेश सुनिश्चित करून, महाराष्ट्र एक उज्जवल आणि अधिक समावेशी भविष्यासाठी वाटचाल करत आहे.

## महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना

महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) महाराष्ट्र राज्य सरकारची एक महत्त्वपूर्ण योजना आहे जी नागरिकांना मोफत आरोग्यसेवा पुरवण्यावर लक्ष केंद्रित करते. या योजनेचा उद्देश गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना गंभीर आजारांवर उपचार करण्यासाठी आवश्यक असलेल्या खर्चाचा भार उचलणे आहे.

**लाभार्थी:**

**या योजनेअंतर्गत खालील गटांतील कुटुंबे लाभार्थी म्हणून पात्र आहेत:**

1. **कॅटेगरी A:**
   - पिवळा रेशन कार्डधारक
   - अंत्योदय अन्न योजना (AAY) रेशन कार्डधारक
   - अन्नपूर्णा रेशन कार्डधारक
   - केशरी रेशन कार्डधारक ज्यांचे वार्षिक उत्पन्न ₹1,00,000 पर्यंत आहे
2. **कॅटेगरी B:**
   - 14 कृषी संकटग्रस्त जिल्ह्यांतील शेतकरी कुटुंबे जे पांढऱ्या रेशन कार्डधारक आहेत.
3. **कॅटेगरी C:**
   - शासकीय अनाथालयातील मुले, शासकीय आश्रम शाळांचे विद्यार्थी, शासकीय महिला आश्रमातील महिला, आणि शासकीय वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिक
   - शासनाने मान्यताप्राप्त पत्रकार आणि त्यांचे आश्रित कुटुंबीय
   - महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याण मंडळात नोंदणीकृत बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबीय

**लाभ:**

**योजनेअंतर्गत लाभार्थींना विविध प्रकारच्या गंभीर आजारांवरील उपचारांसाठी मोफत आरोग्यसेवा दिली जाते. यामध्ये वैद्यकीय तपासण्या, शस्त्रक्रिया, औषधे आणि दवाखान्यातील इतर आवश्यक खर्चांचा समावेश आहे.**

**अर्ज प्रक्रिया**

लाभार्थींना नजीकच्या शासकीय किंवा योजना नेटवर्कमध्ये असलेल्या रुग्णालयात जाऊन लाभ घेता येतो. रुग्णालयातील 'आरोग्यमित्र' हे लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांची तपासणी करून त्यांची नोंदणी करतात. योजनेअंतर्गत सेवा घेण्यासाठी खालील प्रक्रिया पालन करावी लागते:

1. लाभार्थींनी जवळच्या पॅनेल नेटवर्क रुग्णालयात जाऊन उपचार घेण्यास सुरुवात करावी.
2. आरोग्यमित्र लाभार्थ्यांचे रेशन कार्ड आणि फोटो आयडीची तपासणी करून नोंदणी करतो.
3. जर उपचार प्रक्रिया MJPJAY अंतर्गत येत असेल तर रुग्णालय ई-पूर्व प्राधिकरण विनंती करते.
4. वैद्यकीय तज्ञ पूर्व प्राधिकरण विनंती तपासून मंजूर करतात.
5. मंजुरी मिळाल्यानंतर, लाभार्थ्यांना शस्त्रक्रिया किंवा उपचार प्रक्रिया दिली जाते.
6. उपचार पूर्ण झाल्यानंतर रुग्णालय उपचार नोंदी पोर्टलवर अद्यतनित करते आणि दाव्याचा निपटारा करते.

**कागदपत्रे:**

लाभार्थ्यांना खालील कागदपत्रे आवश्यक आहेत:

- **आधार कार्ड किंवा आधार नोंदणी स्लिप**
- **पॅन कार्ड**
- **मतदार ओळखपत्र**
- **ड्रायव्हिंग लायसन्स**
- **शाळा/महाविद्यालय ओळखपत्र**
- **पासपोर्ट**
- **इतर शासन मान्यताप्राप्त ओळखपत्रे**
-

**महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना ही महाराष्ट्रातील नागरिकांसाठी एक महत्त्वाची योजना आहे ज्यामुळे त्यांना आवश्यक आरोग्यसेवा मोफत मिळू शकते आणि गंभीर आजारांवरील उपचारांची चिंता दूर होऊ शकते**

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ॲंड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क:rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क:sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

# बापाशीसाठी...

सायलो खळ्यातसून उठान घरात गेलो. धो धो पडनारो पावस बगीत तो खळ्यात इतको वगत बसललो. पावस बगीत बगीत त्याच्या डोळ्यातसून पावस वताक लागलो. गस्ताली ह्या पावसात बापुस आपल्या वांगडा होतो. बापाशीक जावन वरासदुकू जावक नाय होता. सायलो बापाशीक सोडून येक दिस खडे जाय नाय. आता बापुसच कायमचो लामच्या दुनियेत गेलो. ह्या परसंगात सायल्यान आवशीक सामाळून दाखयल्यान तरी तो मातर बापाशीच्या अचानक जाण्यान पुरो खचलो. हसनारो खेळनारो मजा मस्करी करनारो सायलो शाप थण जालो. घराची आवशीची नि म्हातारे आजयेची त्याचार जबाबदारी बेगीनच पडली. "सायलो खूप शिकान भायरगावाक जातलो" ह्या त्याच्या बापाशीच्या तोंडातच होता. सायलो बापुस गेल्याधरना अभ्यासात कमी इलो. बापाशीचा सपान पुरा करूचा त्याच्या मनात असला तरी घर सोडून जावन कसा जमतला असा त्याका वाटा... आवशीन येक दोनदा सांगान सोडल्यान, " आमची काळजी करू नको, तिया शिकान मोठो जा, तुज्या बापाशीक बरा वाटतला. नाय केलं तर मिया वरते जावन त्यांका काय त्वांड दाखयतलय..." आवस दुखात आसली तरी तिना कामा सोडूक नाय होती. घोवाच्या पाठसून झिलाच्या शिकशनाचा तिकाच बगूचा होता. झिल शिकान मोठो जालो तर घोवाचा सपान पुरा जातला हुनान तिना शिकशनाक साठयललो पैसो अजाबात मोडूचय नाय असा ठरयलला... सायलो मातर अभ्यासात लक्ष घालूकच बगी नाय होतो. उठता बसता बापाशीक आठयत रवा. तोंडात घास घेताना कायम त्याच्या डोळ्यात दुका भरत... बापुस जावन स-सात म्हयने जाले तरी सायलो आजून खोलयेत जावन धाय मोकलान रडा. "रे सायल्या काय रे करतस...??" भर पावसात ख्वाळ घेवन दाजी सायल्याक साद घालीत खळ्यात इलो. ख्वाळ दाराच्या बाजूक ग्रीलात घालून गळत ठेवन तो लोट्यार इलो. दाजीच्या आवाजान सायल्याची आजी भायर इली. "सायलो गे खडे गेलो...?" दाजीन म्हातारेक ईचारल्यान. "खायल्या होवऱ्यात आसतलो. खडे जाना नाय यना नाय. आजून तेचि नजार बापाशीक शोधताहा..." म्हातारी पदर डोळ्याक लावन रडत बोलली. दाजीन म्हातारेक बसाक खुर्ची दिली. म्हातारेक खुरचेर बसवन तो सायल्याक बगूक होवरेत गेलो. सायलो खिनकेर बसान भायर पावसाक येकटक बगी होतो. दाजीन साद घातली तरी सायलो आपलेच तंद्रेत होतो. दाजी फुडे सरलो. सायल्याक हात लावन ढळयल्यान त्येवा त्याना दाजीक बगल्यान.

"काय रे असो तिया... ध्यान नाय तुजा... साद घालतय कदवाधरना..." दाजी बोला होतो तरी दुकू सायलो गप होतो. "सायल्याक बोलतो करू व्हयो नाय तर सोन्यासारखो पोर फुकट जायत... त्याचे आवशीन यवन सांगल्यान ता खराच आसा, सायल्याची गती मंदावली... असोच रवलो तर कायव करून घेयत..." दाजी मनातले मनात इचार करी होतो. "रे सायल्या... फाल्या कोंडीर जावया काय ईचारुक इल्लय मिया... सात आठ पॉर तयार आसत... पावस पडता वारेमाप पानी इला हा.. भिजाया नि कोंडीवयल्या मांगरात रानुन जवया..." दाजी वगीच बोला होता. सायल्याचा त्याचार ध्यान नाय होता. दाजीन सायल्याचे हातीक धरून उठ हुतल्यानं, त्याका वडीतच भर पावसात पाटल्यादारा घेवन गेलो. सायल्याच्या पाटल्या बाजून पुरा रान होता. धो धो वतनाऱ्या पावसात सायलो उबो रवलो तरी त्याका काय फरक पडाना. दाजीन सायल्याच्या कानशिलात मारल्यान. सायलो रडतच चिकलात बसलो. हात चिकलात मारीत "बाबा" हुतल्यान नि मोठ्यान टाहो फोडल्यानं. दाजीन त्याका लागी घेवन मिठी मारल्यान. "आताच काय तो रडान घे... ह्या फुडे तिया रडल तर ह्या दाजीचा मडा बगतलस..." दाजीदुकू सायल्याक समज घालून रडा होतो. दाजी सायल्याचो भावाशीसारो दोस्त होतो. सायल्याच्या त्या दिवसात दाजी यवन जावन लक्ष देय होतो, पुन मागल्या दोन म्हयन्यात तो कामाक लागान गावाभायर गेल्लो. आता इलो तर सायल्याची हालत सुदराची सोडून जास्तीच बिगाडली ह्या कळला. तसो तो ताबडतोब सायल्याक भेटाक इल्लो. दाजीन सायल्याक उठयल्यान घरात व्हरान न्हावक पानी दिल्यान. "सायल्या तिया न्हात हुनासर मिया घराक जावन यतय, न्हावन कपडे बदलतय..." हुनत दाजी घराक गेलो. न्हावन बिवन दाजी परत सायल्याथुय इलो. पावसाचो जोर आता कमी जाल्लो. दाजी घरात इलो तर आल्याच्या चायचो वास घरभर येय होतो. दाजी चुलीकडे इलो. बगता तर सायलो चाय वती होतो. दाजी बगून खुश जालो. सायल्यान चाय करून भायर हाडली. चाय खाता खाता फुडल्या शिकशनाचो इशय काढून सायलो दाजी वांगडा बोलाक लागलो. तडेसुन आवस इली तिना सायल्याक बोलताना बगलेन तशी ती देवाक हात जोडूक लागली. "गे आई... तडेशी ऊबी रवल...? ये चाय खावक... मिया केलंय चाय..." हुनत त्याना उठान आवशीक घरात घेतली. "आई आता बाबाचा सपान पुरा करूचा आसा... रडान चलाचा नाय हा..." आवशीच्या डोळ्यातली दुका पुसत सायलो आवशीक समजाय होतो....



## गजाल

**रीना पास्ते परब**
**पुणे**



# गुरवे नमः

## मालवणी मुलखात



**वयल्यांचा कवग्या,**
**मालवण- सिंधुदुर्ग.**

मिया लगीन न्हालय तेव्हा माका चायचो काढो सोडलो तर काय्येक रांधूक येयत नाय व्हता. कारण लग्नाआधी आवशीन कधी माका चुलीकडे वावराकच दिल्यान नाय. मी काय करूक गेलय काय ती करवादायची. ती म्हणायची, माझ्या आंगात घोपान हा तवसर तुम्ही मजा करा. अभ्यास करा, अभ्यासात उजेड पाडा. पण आम्ही फुडे काय तितकोसो अभ्यासात उजेड पाडूक नाय. जेमतेम बारावीपर्यंत शिकलय नि बापाशीन माझे हात पिवळे केल्यान. पण याक केल्यान, माका बघूक इले ना, तेव्हा स्पष्ट सांगान टाकल्यान. आमचा पॉर गुणी हा. स्वभावान शांत व प्रेमळ हा. खाट नाय का खूट नाय. पण एका बाबतीत तुमका अडचण येयत. ती म्हणजे आमच्या पॉराक जेवान म्हणशात तर अजिबात गंध नाय. तुम्ही शिकवला तर ता शिकतला. तेव्हा सासुबाय पण हजर हुती. ती म्हणाली, जेवान शिकवना काय कठीण नाय. ता आम्ही बघू. पण पोरग्या तोंडावरसूनच गुणी दिसताहा. नाकी डोळी छान दिसताहा. आमच्या पोरग्याक व्हया तसा गोरागोमटा हा. बाकीचा आम्ही शिकवू त्येका. पण तरी माझा काळीज धडधडा. सगळे साशये आधी असाच कौतुक करतत. पण मगे काय दिस गेल्यावर त्येंच्यातली ' क्योंकी सांस भी कभी बहु थी ' जागी व्हता. मगे पावला पावलार ' अगो, आवशीन तुका इतक्याय शिकवक नाय? सारखे टोमणे सुरु होतत. काय काय साशयें तर सुनांचा जीणा हराम करून सोडतत. सुनांवर जीव देवची पाळी आणतत. पण खरा सांगा, माका माझी सासुबाय खराच माझ्या आवशीप्रमाणे भेटली. सुरुवातीपासूनच माझ्यार तिना आवशीसारखी माया केल्यान. माझा कधी काय चुकला तरी माझ्या वरमावर कधी बॉट ठेवक नाय. जेवाण करूक तिनाच माका शिकवल्यान. भातात कधी पाणी जास्त व्हायचा तर कधी कमी. भात कधी चिकचिकीत व्हायचो तर कधी कडक. पण तिना कधी माझ्या भाताक नाव ठेवक नाय. तिनाच माका भाकरे, चपाते करूक शिकवल्यान. सुरवातीक चपाते काय बघशात, चपाते लाटताना जगाच्या नकाशातलो एकय देश माझ्या लाटणेतसून सुटलो नसात. तीच गत डाळ, सांबारा, भाजयेची. पण त्या माऊलीन माका कधी जेवणावरसून नाराज करूक नाय. उलट ती माका समजावायची, भीया नको. आज नाय तर उद्या जमात तुका स्वैपाक. मी शिकवीन तुका हळूहळू. तिना माका खराच एकेक पदार्थ रांधूक शिकवल्यान. आज मी घरातली मेन सुगरण झालंय. पण त्येचा सगळा श्रेय तिकाच जाता. आज मी रांधलल्या मटणाचा, वड्यांचा, पोळयांचा सगळेच कौतुक करतत. माझ्या आंगार मुठभर मांस वाढता. पण ह्या सगळा माका रांधूक शिकवल्यान माझ्या सासुबायन. आज गुरुपौर्णिमा. आपल्याक ज्ञान देणाऱ्या गुरुमाऊलीक आज सगळेच वंदन करतत. कृतज्ञता व्यक्त करतत. माका जरी अभ्यास शिकवल्यान नसल्यान, पुस्तकी ज्ञान दिल्यान नसल्यान तरी माझी सासुबाय हीच माझी गुरुमाऊली हा. आजच्या दिनी मी तिकाच वंदन करतय.

**जय गुरुमाऊली!**









## "खव्याचे मोदक"



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

नवीन आणि रुचकर "खव्याचे मोदक" रेसिपी

**साहित्य:**

- खवा (मावा) - २ कप
- साखर - १ कप
- वेलची पूड - १ टीस्पून
- तूप - २ टीस्पून
- बारीक चिरलेला सुकामेवा (बदाम, काजू, पिस्ता) - १/२ कप
- केशर - १/४ टीस्पून (वैकल्पिक)
- नारळ - १/२ कप (ताजा किंवा सुकवलेला)

**कृती:**

1. खव्याची तयारी:
   - एका कढईत २ टीस्पून तूप गरम करा.
   - गरम तूपात खवा टाका आणि मंद आचेवर हलवून भाजा. खवा हलका गुलाबी रंगाचा झाला की गॅस बंद करा आणि थंड होऊ द्या.
2. साखर मिसळणे:
   - खवा थंड झाल्यावर त्यात साखर आणि वेलची पूड मिसळा. हे मिश्रण छान एकत्र करा.
3. सुकामेवा:
   - बारीक चिरलेला सुकामेवा खव्याच्या मिश्रणात मिसळा.
   - जर तुम्हाला केशर वापरायचे असेल तर, थोड्या दुधात केशर भिजवून त्याचे थेंब मिश्रणात घाला.
4. नारळाचे मिश्रण:
   - खव्याच्या मिश्रणाच्या छोट्या गोळ्या तयार करा.
   - प्रत्येक गोळीच्या मधोमध अंगठ्याने खड्डा करा आणि त्यात थोडा नारळ भरा.
   - खड्डा बंद करून मोदकाचा आकार द्या.
5. मोदकांची वाफवणे:
   - तयार केलेले मोदक स्टीमरमध्ये १०-१२ मिनिटे वाफवा.
   - मोदक वाफवून झाल्यावर गॅस बंद करा आणि स्टीमरमधून बाहेर काढून थंड होऊ द्या.

**सर्व्हिंग:**

तुमचे खव्याचे मोदक तयार आहेत! हे मोदक गणपती बाप्पांच्या नैवेद्यासाठी तसेच घरातील कुठल्याही गोड कार्यासाठी परफेक्ट आहेत. हे मोदक लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना आवडतील. अशा प्रकारे, या गोड पदार्थाने आपल्या घराला एक नवीन आणि स्वादिष्ट भारतीय टच द्या!



## अशीही एक अनुभवलेली वारी!

दीपक गुंडये,
मुंबई

पंढरीच्या वारीची महती आगळीवेगळीच आहे. २१ दिवस घरादारापासून दूर राहत वारीसंगे मार्गक्रमणा करत आषाढी एकादशीला वारकरी पोहोचतो तेव्हा त्याच्या मुखावर एक आगळे तेज चमकत असते. कारण सावळ्या विठूचे दर्शन त्याला घडत असते. नित्यनेमाने वारी करणाऱ्या वारकऱ्यांच्या वारीत करोनामुळे दोन वर्षे खंड पडला होता. दोन वर्षापूर्वी २०२२ साली मात्र करोना निर्बंध उठल्यानंतर पूर्वीच्याच उत्साहाने वारकरी वारीत सहभागी झाला आणि त्याच्या आनंदाला पारावार उरला नाही.


करोनामुळे तसे सगळ्याच बाबतीत बंधने आली होती. शाळाही आॅनलाइन भरत होत्या. त्यामुळे दरवर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने निघणाऱ्या छोट्या विद्यार्थ्यांच्या दिंड्याही निघाल्या नव्हत्या. २०२२ साली मात्र विविध शाळांतून त्या आवर्जून निघाल्या. छोट्यांनीही त्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून वारीचा आनंद लुटला. काही शाळांनी शुक्रवारी तर काही शाळांनी शनिवारी दिंडी काढली. पण वरळी विभागातील सहकारी शिक्षण समूहाच्या मराठा हायस्कूलचा माध्यमिक विभाग, वसंतराव शंकर देसाई प्राथमिक विभाग, एसव्हीएस माध्यमिक व प्राथमिक विभाग यांची दिंडी मात्र आषाढी एकादशीच्याच दिवशी १० जुलै २०२२ रोजी रविवारीच निघाली. यानिमित्ताने कुणी विठ्ठल, कुणी रुक्मिणी, काहीजण विविध संत तर बरेचसे वारकरी बनून अत्यंत उत्साहाने सकाळी आठच्या सुमारासच शाळेच्या प्रांगणात जमा झाले. मुलांबरोबरच पालकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. आपल्या छोट्याचे वेशभूषेतील फोटो काढतानाच इतरांचेही फोटो पालक मोबाईलमध्ये टिपून घेत होते.

सकाळी ठिक साडेआठ वाजता दिंडी सुरु झाली. लेझिमपथक, ढोलपथक, संदेश देणारे फलक घेतलेले पथक, स्काऊट गाईड पथक, तुळस वाहणाऱ्या विद्यार्थीनी, विठ्ठल, रखमाई, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर इत्यादी संतमंडळी, वारकरी यांचा भरणा असलेली दिंडी मार्गक्रमणा करु लागली. या दिंडीच्या मधोमध अर्थातच पालखी होती. पाऊस अधूनमधून रिमझिमत होता. पण त्यामुळे दिंडीची शिस्त कुठेही मोडत नव्हती. सर्व शिक्षक वारकऱ्यांना व्यवस्थित सांभाळत होते. पालकही दिंडीसोबतच मार्गक्रमणा करत होते. अर्थात मीही दिंडीसोबत होतोच.

वरळीच्या बीडीडी चाळीतील ७९ क्रमांकाच्या इमारतीजवळील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात प्रथेप्रमाणे दिंडी गेली. तिथे पालखीपूजा केली गेली. दिंडीदरम्यान परिसरातील रहिवाश्यांना शिक्षकांच्या हस्ते तुळशी रोपांचे वाटप करण्यात येत होते. दिंडी सोहळा पाहण्यासाठी रहिवाश्यांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती. दिंडीचे वार्तांकन करण्यासाठी काही वाहिन्यांचे प्रतिनिधीही उपस्थित होते. मंदिरात पूजा झाल्यानंतर परत दिंडी सुरु झाली आणि ती बीडीडी चाळ क्रमांक २७ व २८ च्या प्रांगणात असलेल्या आषाढी एकादशीनिमित्तच्या कार्यक्रमस्थळी गेली. तिथे थोडा वेळ थांबल्यानंतर दिंडीतील वारकऱ्यांना परतीचा मार्ग पकडला.

**आतापर्यंत पंढरीच्या वारीला जाणे झालेले नाही. पण शाळेच्या दिंडीनिमित्त का होईना त्या वर्षी वारी अनुभवता आली. याहून दुसरे सुख ते कोणते?**

## 'गड किल्ल्याचे स्थापत्य शास्त्र







**'गड किल्ल्याचे स्थापत्य शास्त्र'** या पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले. यावेळी लेखक विलास कोळी, प्रशासकीय अधिकारी अनिल पवार, आर्किटेक्ट राहुल चेंबूरकर, प्रकल्प अभियंता प्रमोद साळूंखे, लेखापाल अंबादास सामलेटी, श्रीकांत देशपांडे, सारिका गायकवाड, पूजा गुरव आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी लेखक विलास कोळी यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांना कोणी चित्रात शोधलं, कोणी पुस्तकात शोधले, कोणी फोटोत शोधलं, कोणी युद्ध तंत्रात शोधले, तर कोणी चौकातील स्मारकामध्ये शोधले. आम्ही मात्र छत्रपती शिवाजी महाराजांना गड किल्ल्याच्या बांधकाम तंत्रात शोधले.


आपल्या पूर्वजांनी गडकिल्ले कसे बांधले, त्याची निगा कशी राखली, त्याचे संरक्षण कसे केले. ते शिवधनुष्य त्यांनी कसे पेलले. याची इंत्यभूत माहिती म्हणजे 'गड किल्ल्याचे स्थापत्य शास्त्र' हे पुस्तक आहे.

गड किल्ल्याबद्दलचे प्रेम दिवसेंदिवस गडप्रेमी मध्ये वाढत आहे. हे गड किल्ल्यांवर जाणाऱ्या पर्यटकांच्या प्रचंड संख्येवरून लक्षात येते. गडकिल्ल्यांना भेट देणाऱ्या पर्यटकांना आणि त्यांच्याबरोबर असलेल्या लहान मुलांना तसेच शाळेमधील सहलीला आलेल्या मुलांना तेथील एलिमेंटसची माहिती नसते. जंग्या म्हणजे काय, फांजी म्हणजे काय, चर्या म्हणजे काय, बालेकिल्ला कशाला म्हणावे, चिलखती बुरुज कशास म्हणतात. अशा ऐतिहासिक वास्तूची माहिती नसते ती माहिती व्हावी म्हणून 'गड किल्ल्याचे स्थापत्य शास्त्र' हे पुस्तक उत्तम गाईडची भूमिका बजावणार आहे. गड किल्ल्यातील एलीमेंटसची सर्व माहिती एकत्र मिळावी हा मुख्य हेतु असल्याचे लेखक विलास कोळी यांनी सांगितले.

## आठवणींच्या गोष्टी

श्रीनिवास भार्गवराम घैसास,
केळशी, ता. दापोली.

# मला भावलेले दादा अर्थात श्री सुभाषराव दांडेकर



नुकतेच कॅम्लीन कंपनीचे सर्वेसर्वा, महान उद्योजक तसेच अनेक सामाजिक संस्थांवर काम करणारे श्री सुभाषराव दांडेकर यांचे निधन झाले. अशा या महान व्यक्तीबरोबर श्री श्रीनिवास भा. घैसास यांना त्यांच्याबरोबर अनेक वर्षे काम करण्याची संधी मिळाली त्यामुळे त्यांना त्यांच्या स्वभावाचे जवळून अवलोकन करता आले. त्यानी त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू उलगडून दाखवण्यासाठी व श्रद्धांजली वाहण्यासाठी लिहिलेला हा लेख.

सन1979-80 च्या सुमारास मी मुंबई येथे नोकरी निमित्ताने आलो.सुदैवाने त्यावेळी मला सँडोझ कंपनीत अप्रेंटिसशिप देखील मिळाली. परंतु त्यानंतर दुर्दैवाने त्या ठिकाणी संप चालू झाला आणि आता पुढे काय करायचे हा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला. त्यावेळी मला ति.काकासाहेब दांडेकर यांची आठवण झाली. कारण काकासाहेब हे आमच्या गावचे ते आमच्या शाळेचे चेअरमन होते, तसेच श्रीराम मंदिरा चे देखील ते एक हितचिंतक होते. मी केळशी या ठिकाणी शिकलेला होतो व त्याच शाळेतून 1973 साली अकरावी पास झालो होतो. त्यामुळे त्यांच्याशी माझा थोडाफार संबंध होता. म्हणून मी थोडे धाडस करून त्यांच्या घरी गेलो आणि माझी सर्व परिस्थिती त्यांना सांगितली. त्यानंतर मला आश्चर्याचा धक्का बसला. काकांनी माझी कोणतीही चौकशी न करता याला कामावर घ्या असे सांगितले आणि दुसऱ्या दिवशी मी कॅमलिन या कंपनीत कामावर रुजू झालो. त्या दिवसापासून माझा दादांशी म्हणजेच सुभाषराव दांडेकर यांच्याशी संबंध आला.

मी सुभाष रावांच्या आर्ट मटेरियल विभागात कामाला लागलो होतो. त्यामुळे दादांचा तसेच रजनीताई यांच्याशी माझा दररोज संबंध येऊ लागला. याबरोबरच दिलीप दांडेकर हे देखील त्यावेळी प्रशिक्षण घेत होते. ते दादांचे भाऊ व काका साहेबांचे चिरंजीव असले तरी त्यांनी तसे कधी जाणवून दिले नाही. या सगळ्यांनी काम कसे करावे याचे धडे मला दिले. चूक झाली तर ते समजावून सांगत असत. सहा महिन्यातच त्यांनी मला नोकरीत कायम सुद्धा केले. याच वेळी मला दुसऱ्या कंपनीत नोकरीची संधी आली. त्या ठिकाणी थोडा पगार जास्त होता माझ्यापुढे मोठा पेच उभा राहिला. काय करावे हे कळेना. या ठिकाणीच काम करू, की नोकरी सोडू असा प्रश्न होता. शेवटी मी मोकळ्या मनाने हा प्रश्न दादांजवळ बोललो आणि माझी सर्व परिस्थिती त्यांना सांगितली. त्यावेळी त्यांनी एका मिनिटांमध्ये तू नवीन ठिकाणी रुजू हो असे मला सांगितले आणि तसे झाले तरी आपले संबंध तसेच राहतील असे स्पष्ट सांगितले. मला तर माझ्या डोक्यावरचे ओझे हलके झाल्यासारखे वाटले आणि खरोखरच त्यानंतर त्यांच्या घराशी असणारे माझे संबंध आजपर्यंत तसेच राहिले आहेत. कोणत्याही दोन गोष्टी एकमेकात मिसळायच्या नाहीत व त्याचा परिणाम अन्य गोष्टींवर होऊन द्यायचा नाही हा एक मोठा धडा मी त्यावेळी दादांकडून शिकलो.

त्यानंतर आपण शाळेसाठी काहीतरी करावे असे विचार मनात घोळू लागले. कारण शाळेला देणगी द्यावी अशी काही माझी परिस्थिती नव्हती. म्हणून मग थोडे श्रम तरी द्यावे अशा विचाराने मी केळशी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारी मंडळात काम करू लागलो. त्यावेळी शरदराव दांडेकर हे संस्थेचे काम पाहत असत. त्यांच्याकडून संस्थेचे काम कसे करावे हे धडे मी घेतले. त्यानंतर शरद रावानी संस्थेचे अध्यक्षपद सोडले होते. आता अध्यक्ष कोण होणार असा विषय होता. त्यावेळी काकूही आमच्याशी बोलत असत. काकू म्हणजे सुभाषराव यांच्या आई, त्यांनी मला सांगितले अरे श्रीनिवास, दादाला संस्थेच्या कामांमध्ये घ्या, त्याचा फायदाच होईल. आम्ही सर्वांनी दादांना संस्थेचे अध्यक्ष व्हा, म्हणून गळ घातली, आणि त्यांनी ती मान्य ही केले. त्यानंतर पुन्हा त्यांचा आणि माझा घनिष्ठ संबंध आला. ते अध्यक्ष असताना मला संस्थेचा सेक्रेटरी म्हणून काम करण्याची संधी मिळाली आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी संस्थेचा सेक्रेटरी म्हणून अनेक वर्षे काम केले. हे काम करत असताना आम्ही सर्वांनी केळशी येथे फक्त दहावीपर्यंत शाळा आहे. तेथील मुलांना बाहेरगावी राहणे परवडत नाही, म्हणून इयत्ता अकरावी व बारावी चे वर्ग सुरू करावे, असा विचार पुढे आला अर्थात दादांनी त्याला लगेच संमती दिली. आम्ही जोमाने कामाला लागलो. त्यात श्री सुरेश गुरव ते आता हयात नाहीत त्यांचा देखील खूप मोलाचा वाटा आहे हे या ठिकाणी मुद्दाम नमूद केले पाहिजे.

शेवटी अथक प्रयत्नाने आमचे केळशी येथील कनिष्ठ महाविद्यालय सुरू झाले. परंतु ते त्यावेळी विनाअनुदानित होते, त्यामुळे आम्हाला मुंबईहून प्राध्यापकांच्या पगारा एवढे पैसे दरमहा पाठवावे लागत. यावेळी देखील दादांचा आणखी एक गुण माझ्या मनाला भावला. आपल्याला जरी अनुदान नसले तरी प्राध्यापकांकडून आपण पूर्णवेळ काम करून घेतो तेव्हा त्यांना पूर्ण पगार द्यायचा ही त्यांची वृती होती. त्यावेळी सहजपणे पूर्ण पगारावर सही घेऊन अर्धा पगार देणे वगैरे शक्य होते. परंतु दादांनी हे करून दिले नाही. त्यासाठी आम्ही सर्वांनी अनेक प्रकारचे कार्यक्रम करून संस्थेसाठी देणग्या मिळवल्या. या कामात दादांची आम्हाला बहुमोल मदत झाली. यावेळी आम्ही श्री विनायक दादा रंगमंच यांचे अनावरण, संगीत रजनी त्यावेळच्या केंद्रीय मंत्री व केळशीलां सासर असणाऱ्या सौ सुमित्राताई महाजन यांचा सत्कार, असे अनेक कार्यक्रम पार पाडले या सर्वाला दादांचा आम्हाला भक्कम पाठिंबा होता.

याच दरम्यान श्री अनंत गीते साहेब हे रत्नागिरी जिल्ह्याचे खासदार होते. त्यांच्याशी देखील आमचे उत्तम संबंध होते. आम्ही विद्यार्थी संख्या वाढावी यासाठी केळशीला एक लेडीज हॉस्टेल बांधायचे ठरवले. या कार्यक्रमाला देखील दादांनी चांगलाच पाठिंबा दिला, व श्री गीते यांच्याशी बोलण्यास देखील सांगितले. श्री गीते साहेबांना आम्ही भेटलो, आणि त्यांना आमची अडचण सांगितली व आमचा प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेवला. त्यांनी देखील कोणतेही आढेवेढे न घेता त्यांच्या खासदार फंडातून तातडीने निधी उपलब्ध करून दिला. आणि केळशी येथे एक नवीन वास्तू उभी राहिली. अर्थात याच्या अनावरण प्रसंगी श्री गीते साहेब, दादा तत्कालीन आमदार श्री सूर्यकांत दळवी आदी उपस्थित होते. समारंभ खूप छान झाला आणि दादांनी आमच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकली. हा क्षण माझ्या आयुष्यातील खूप मोठा क्षण होता. तो मी अद्याप तसाच जपून ठेवला आहे. त्यानंतर कनिष्ठ महाविद्यालय सुस्थितीत राहावे त्यासाठी दादानी त्यांच्या वडिलांच्या प्रित्यर्थ म्हणजेच काका साहेबांच्या स्मरणार्थ संस्थेला मोठी देणगी दिली. संस्थेने देखील कृतज्ञता म्हणून ज्युनिअर कॉलेजला काका साहेबांचे नाव दिले या सर्वाचा मी साक्षीदार होतो. याचा देखील मला खूप अभिमान वाटतो. यानंतर अनेक प्रयत्नाने सदर कनिष्ठ महाविद्यालय अनुदानित झाले त्याला अनेकांचे श्रम कारणीभूत आहेत. हे सर्व करत असताना काही कटू अनुभव देखील आले. संस्थेतील एका शिक्षकाला नैतिकतेच्या कारणावरून काढणे भाग पडले. ज्यावेळी देखील दादा आमचे बरोबर ठाम राहिले, आणि नैतिकतेशी तडजोड नाही असा संदेश जणू त्यांनी आम्हाला दिला. त्यामुळे त्यातून देखील आम्ही ताऊन सुलाखून निघालो. हे सर्व करत असताना माझ्या मनामध्ये वकिली करावी असा विचार येत होता. त्याला देखील दादांनी प्रोत्साहन दिले एवढेच काय पण ज्या दिवशी माझ्या वकिलीच्या कार्यालयाचे अनावरण मी केले त्या दिवशी दादा स्वतः ठाण्याला आले. आणि त्यांनी मला शुभाशीर्वाद दिले. आज त्यांच्याच आशीर्वादाने मी माझे कार्यालय उत्कृष्टरित्या चालवत असून मला भारत सरकारने नोटरी म्हणून देखील नेमले आहे.

हे सर्व करत असताना त्यांचे गावाकडेही लक्ष असे दांडेकर कुटुंबीय हे नेहमी गावात आले की श्रीरामाचे पुजारी आहोत असे अभिमानाने सांगतात. दादाही त्याला अपवाद नव्हते. खरे तर दांडेकर कुटुंबीयांना केळशीला बंगला वगैरे बांधता आला असता, परंतु आजही ते आले की श्रीराम मंदिराच्या आवारात असलेल्या जुन्या घरातच उतरतात. किती मोठे झालो तरी आपले मूळ विसरायचं नाही हे देखील मी दांडेकर कुटुंबीयांकडून शिकलो. भविष्यात संस्थेसाठी जागा लागेल यासाठी त्यांच्याच मार्गदर्शनाखाली केळशी येथे संस्थेने जागा घेऊन ठेवली. यात देखील त्यांचा दूरदर्शीपणा दिसून येतो.
दादा अनेक संस्थांवर विश्वस्त म्हणून काम करायचे ते सिकॉम चे अध्यक्ष देखील होते. परंतु मी कधीही फोन केला तर त्यांनी त्याला प्रतिसाद दिला नाही, असे कधीच झाले नाही. आलेल्या संकटाला तसे तोंड द्यायचे ते करत असताना आपले तत्व कसे सोडायचे नाही याचा आदर्श दादांनी मला घालून दिला. कॅमलिन कंपनी चे मॅनेजमेंट डायरेक्टर अनेक संस्थांचे विश्वस्त अनेक महामंडळाचे अध्यक्ष अशा खूप मोठ्या व्यक्तिमत्त्वाबरोबर मला काम करायला मिळाले हे माझे मी भाग्य समजतो.

काकासाहेब, मालती काकू, रजनीताई, शरद राव, दिलीप दांडेकर, चंद्रशेखर दांडेकर, त्यांचे वडील त्र्यंबकराव दांडेकर आदी सर्वांशीच माझा अतिशय जवळून संबंध आला. या सर्वांच्या स्वभावाचे अवलोकन मला करता आले. या सर्वांनी मला काही ना काहीतरी दिले आहे. आणि तीच माझ्या आयुष्याची पुंजी आहे आणि त्या पुंजीच्या जोरावर आज पर्यंत मी यशस्वीरित्या कालक्रमणा करत आलो आहे.

आज दादा आपल्यात नाहीत याचे निश्चितपणाने दुःख वाटत आहे, परंतु अशा महान व्यक्ती बरोबर आपल्याला अनेक वर्षे काम करता आले त्यांच्या स्वभावाचे अवलोकन करता आले याबद्दल समाधान देखील वाटत आहे. काळापुढे कोणाचेच काही चालत नाही मात्र दादांच्या जाण्याने माझ्या आयुष्यात एक कायमची पोकळी निर्माण झाली एवढी गोष्ट मात्र निश्चित. कै. दादांना श्रीराम सद्गती देवो व त्यांचे कार्य भावी पिढीला सतत मार्गदर्शक ठरो ही श्रीराम चरणी प्रार्थना! पुन्हा एकदा दादांना भावपूर्ण श्रद्धांजली ! इती लेखन सीमा

## वारी वारी, काय वारी.

डॉ. प्रेमा मेणशी,
बेळगावी- कर्नाटक

मी डॉक्टर, सरकारी इस्पितळात शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या गोरगरीब रोग्यांच्या मदतीला प्रतिज्ञाबध्द.
मी दोन चिमुकल्यांची आई आणि बाबाही. वारीच्या वेळी त्यांचं शालेय वर्ष सुरू झालेलं असायचं आणि त्यांच्या तात्पुरत्या देखरेखीला देखील चौथं माणूस नव्हतं, घरात. एखाद्या नातेवाईकाला बोलावून घ्यावं म्हणजे आई आणि सासूबाई दोघीही आयुष्याच्या संध्याकाळ जगणाऱ्या. कर्तव्य वेड्या माझ्या कडून फक्त त्यांच्याबरोबर सुखासमाधानाने जगणं तेवढंच शक्य होतं, पण त्यांना जास्तीत जास्त वेळ देणं अशक्य होतं. अशा परिस्थितीत माझ्या खट्याळ मुलांची जवाबदारी पूर्णतः त्यांच्यावर सोपवून मी निश्चिंतपणे वारी करू शकत नव्हते आणि तरीही ओढून ताणून वारी सुरू केली असती तरी माझं मन विठुरायाच्या भक्तीत गुंग न होता माझ्या प्रिय व बिचाऱ्या आई अथवा सासुबाईंच्या काळजीतच गुरफटून गेलं असतं, कि माझ्या लाडक्यानं निरागसपणेच पण तरीही जाचदायक घोर त्यांच्या जीवाला लावला असावा काय? इ. इ.

नंतर मुलं मोठ्या वर्गात दाखल झाली. मग काय विचारता, शिक्षण त्यांचं सुरू होतं, पण दिननित्य परीक्षा माझी होतं होती. मी विठुमाऊलीची विनवणी करायची, 'देवा, याही वर्षी माफ कर. अन्यमनस्क होऊन मी नाही चंद्रभागेच्या तीरी येणार, पुढे कधीतरी. नाही तर'सखू गेली पंढरपूरा, वेशीपासून आली घरा ' अशी माझी गत व्हायला नको. याही वर्षी माझी वारी सरड्यासारखी कुंपणापर्यंतच. मी इथल्या इथे माझ्या खोपटापासून सुरू करुन अंतरीच्या पंढरपुरापर्यंत वाटचाल करून मनाच्या गाभाऱ्यातील कानडा विठ्ठलाचं दर्शन करून तृप्त होईन.'

बघता बघता आयुष्याची सांज झाली, सरकारी कामातून मी निवृत्त झाले. आणि मी माझं अपुरं स्वप्न पूर्ण करण्यास प्रवृत्त झाले. मला माहित होतं, मी घरापासून दूर असलेल्या लेकरांना सांगितलं तर ती कालची चिमुरडी आता माझ्या पालकांच्या भुमिकेत शिरून मलाच सल्ला देणार, तुझं वय, तुझी साखर, तुझा रक्तदाब वगैरे वगैरे मी त्यांना कळवलंच नाही. सरळ त्यावर्षीच्या वारीत सामील झाले. सर्व गोळ्या इंजेक्शन सहीत व सोबत माझ्या वाहनचालकाच्या निगराणीत कार घेऊन. वारकऱ्यांच्या संगतीत मजल दर मजल करत मी चालत होते. पहिले दोनचार दिवस जरा कठीणच होते. रात्री पाय दुखणे, रात्री थोडीशी झोपमोड होणे इ. इ. पण हळूहळू सवय पडली, कुठे कसलीही अडचण नाही भासली आणि अखेर मनोबल व मुख्य म्हणजे त्याच्या कृपेनं चंद्रभागेचं वाळवंट गाठलं. दर्शनानंतर विठू माउलीची माफी मागून परतीचा प्रवास वाहनाने करून घरी परतले. अशी ही माझी ५०% टक्क्याची वारी पाचा परिच्छेदात सुफळ संपूर्ण.

गुरुवंदना

# गुरुपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

## गुरुवंदना..!

ज्यानी, ज्यानी
मला या जीवनी...
आकार दिला,
आधार दिला,
अमर्याद ज्ञान दिलं,
त्या सर्व गुरूनां
माझे त्रिवार वंदन...!

ज्यानी, ज्यानी
मला या जीवनी...
जगायला शिकवलं,
लढायला शिकवलं,
संघर्ष करायला शिकवलं,
त्या सर्व गुरूनां
माझे त्रिवार वंदन...!

ज्यानी, ज्यानी
मला या जीवनी...
सुख, समृद्धी
अन् परम शांतीचा
मार्ग दाखवला,
त्या सर्व गुरूनां
माझे त्रिवार वंदन...!

ज्या स्वामी समर्थांनी
माझ्या या जीवनी...
"तू भिऊ नकोस,
मी तुझ्या पाठीशी आहे"
हा कानमंत्र दिला,
त्या सद्गुरुनां
माझे त्रिवार वंदन...!

**प्रा.के.एस.शिरबंदे,**
**दापोली.**

## गुरु

रुगुरु आहे दीपस्तंभ,अन तोच ध्रुवतारा
दिशाहीन जहाजाला, त्याचाच रे सहारा...

कवितांच्या बागेमधुनी, तोच तुम्हा फिरवी
उमललेल्या फुलांचा, तोच सुगंध देई
तोच उभारी तुमच्या, स्वप्नातील मनोरा....

इतिहासाच्या सोनेरी क्षणांचा, तोच होई सोबती
कधी बनूनी बाजीप्रभू, तर कधी छत्रपती
अभिनयाने त्याच्या , येई अंगावरी शहारा....

गणिताची ती आकडेमोड, शिकवी होऊनी कठोर
व्यवहार शिकविण्या तुम्हा, तो देई कधी मार
बाहेरुन दिसे उग्र तरी,आतून निर्मळ जलधारा...

विज्ञानाच्या जादूई नगरीचा, तोच होई जादूगार
प्रयोग करुनी दावी, रोज नवनवे अविष्कार
अंधश्रद्धेचा फाडूनी बुरखा, उघडी सत्याचा चेहरा

भूगोलाच्या नकाशात, सफर करवीतो विश्वाची
ग्रह ता-यांची ओळख देता, मैत्री होते त्यांच्याशी
त्याच्याच हाती सुरक्षित आहे, आपली वसुंधरा....

ज्ञानग्रहण हे करीत असता, विसरु नका त्याला
स्वत: त्यागून सुख त्याने, घडवीले तुम्हा आम्हाला
अखंड विश्वात भरुन राहीला, व्यापीले चराचरा....

**संतोष पवार,**
**सावंतवाडी**




## गुरु

गुरूला भजावे गुरूला पुजावे
गुरूच्या पदाशी सदा लीन व्हावे
गुरू भेटतो का असा वाम मार्गी
गुरू शोधताना तयां आठवावे

गुरू मार्ग दावी गुरू बोध देई
कधी नाव घेता गुरू धाव घेई
किती काय केले असे द्रव्य गोळा
अखेरीस जाता गुरू मुक्ति देई

जयाने गुरूला मनीं साठवीले
गुरूने तयाचे जिणे सार्थ केले
प्रपंचात कोणी कधी जाय खाईं
गुरूने तयाला त्वरें वाचवीले

गुरू मंत्र सोपा जपावा स्मरावा
गुरू स्थान कोठे तयां ठाव घ्यावा
गुरूचा कपाळी टिळा माखवावा
गुरू नित्य चित्ती जनां दाववावा

गुरू नाम मोठे तया अंत नाही
मला पामराला मुळीं खंत नाही
गुरू आज ऐसे मला लाभले ते
गुरूच्या कृपेला दुजा पंथ नाही

**बाबू घाडीगांवकर**

# काव्यांगण

## गुरुवंदना.

माझे गुरु थोर
मज त्यांचा गर्व
तयांमुळे ज्ञान
नेटके ते सर्व

माझे गुरु थोर
मिळाली भाकर
उचलला सारा
मिळाला आकार

माझे गुरु थोर
लाभली सुबत्ता
सहज मिळाली
जगण्याची सत्ता

माझे गुरु थोर
कळले आचार
प्रयत्न करता
खुले झाले द्वार

माझे गुरु थोर
मी किती लहान
अस्तित्व मिळाले
प्रेरणा महान

माझे गुरु थोर
भाळी माझ्या देव
गवसला सुर
आला जगी चेव

**स्वाती विष्णु नष्टे,**
**सातारा**

## गुरू-शिष्य

पादाकुलका मधल्या मात्रा
मोजत मोजत शिकते आहे
गुरू शिष्याचे अमोल नाते
जपता जपता घडते आहे

वेळोवेळी घडवत गेले
कितिदा साऱ्या चुकाच झाल्या
गुरूजनांनी सूचित करता
सराव करूनी मग सुधारल्या

या विद्येची खुली कवाडे
कष्टसाध्य पण सारे आहे
कवितेसाठी धडपड करणे
अजून प्रयत्न करते आहे

साहित्याचा वसा घेउनी
कल्पकतेने लिहिते आहे
ताललयीचे नियम पाळणे
अजून प्रयत्न करते आहे.

**निर्मला देऊसकर,**
**सातार्डा- सावंतवाडी**



# बालजगत

## याचसाठी केला होता अट्टाहास...



गौरी यशवंत पंडित,
वेंगुर्ला

नुकतेच कॉलेज संपले होते आणि मी नोकरीला लागले होते. मोठी बहीण आणि मी आम्ही दोघींनी पंढरपूरला जायचा बेत आखला, एक ट्रॅव्हल कंपनी गाठली आणि आम्ही दोघीच निघालो पंढरपूरच्या वारीला. नेहमीची आषाढी एकादशीची वारी जरी नव्हती तरीसुद्धा आम्ही प्रवासाला, दर्शनाला जातो म्हणून ती आमच्यासाठी वारीच!

प्रवास काही फारसा सुखाचा झाला नाही कारण आम्हाला अगदी शेवटच्या सीट्स मिळाल्या होत्या बस मधल्या. त्यामुळे बस बऱ्यापैकी उडत होती आणि आमच्या मागे जी मोठी सीट होती, त्या सीटवर क्लीनर आणि इतर काही हेल्पर मंडळी बसलेली होती ती संपूर्ण वेळ सिगारेट फुकत होती. त्यामुळे आम्हा दोघांनी त्याचा बऱ्यापैकी त्रास होत होता. परंतु विठ्ठल दर्शनाला जायचं त्यामुळे आनंद पोटात माझ्या माईना अशी परिस्थिती होती ! आम्ही त्या गोष्टीचा फारसा विचार केला नाही एक दोनदा सिगरेट विझवा एवढं मात्र सांगितलं. पण आम्ही तरुण मुली, आमचं ऐकावंसं त्यांना मुळीच वाटलं नाही आणि आमचे शब्द त्यांच्या या कानातून आत जाऊन त्या कानातून बाहेर पडले.

थंडीचा अंदाज न आल्याने मी स्वेटर घेतला नव्हता. आता ब-यापैकी थंडी पडत होती. ताईने मला आपला स्वेटर दिला, आणि स्वत: मात्र गारठली. उतरल्यानंतर ही चप्पल तुटणे, पाय गारठून जाणे, न चालवणे, पोट खराब होणे, अशा अनेक अडचणी आ वासून उभ्या होत्या.

पण सावळ्या विठू च्या दर्शनासाठी आतुर झालेल्या आम्हाला काहीच वैषम्य वाटले नव्हते. तेव्हा मंदिराच्या इमारतीचे काम चालू होते, देवासाठी तुळशीच्या माळा आणण्यासाठी बॅगेत हात घातला, तर पैशाचे पाकीटच गायब.

इतर प्रवाशांपैकी एकाने आम्हाला पैसे देऊ केलेले, पण त्याच्या रखुमाईला ते काही फारसे आवडले नाही, मग आम्हीही हात पुढे केला नाही.

देवापुढे पोहोचले, तेव्हा हात आणि मन दोन्ही पूर्ण रिकामे होते, डोळ्यात पाणी येऊन त्याला विचारले ,"का रे बाबा?" तर तो आपला मंद हसत होता. क्षणभर त्याच्या पायावर डोके ठेवावे, ह्याच चरणकमलांवर किती संत महात्मे झुकले. मोठमोठी माणसे नतमस्तक झाली. मग मी कोण? आणि देणार तरी काय होते त्याला? विचारांनीच गदगद झाले, पण, पोलिस स्त्री ओढून बाहेर काढत होती.

मी गर्भगृहाच्या बाहेर आले, वळून पाहिले, तो अजूनही हसतच होता, माझी पायावर डोके टेकवायची इच्छा अपूर्णच राहिली . मी परत बाहेर पडायच्या मार्गानेच एका ओढीने आत शिरले , पोलिस बाई बायकांवर डाफरत होती, तिला काही कळायच्या आत चरणांवर डोके टेकवले, बस्स! आता मला नेले तरी चालेल, पण मी कान्होपात्रा थोडीच होते!

"अरे, ही मुलगी परत आली वाटते", असे म्हणून ती मला बाहेर काढू लागली.

**देवाचे हास्य आता माझ्या चेह-यावर प्रतिबिंबित झाले असावे.**

## नवी शाळा नव्या मैत्रिणी




**कु. वेदिका सुभाष मुलूख,**
**इयत्ता- आठवी**

मी पहिली ते सातवी मराठी शाळेत होते. जेव्हा मी हायस्कूलला गेले तेव्हा माझ्यासाठी सर्व नवीन होतं. पण जेव्हा आपण हायस्कूलला गेलो की आपण मुले घाबरतोच.

मी जेव्हा पहिल्यांदाच शाळेत गेले तेव्हा माझ्या कोणी जास्त मैत्रिणी झाल्या नव्हत्या. तिथे प्रत्येक अर्ध्या तासाला वेगवेगळे शिक्षक. नवीनच शाळेत सर्व मुले सातवीतून आठवीत गेलेली तेव्हा आमच्या वर्ग शिक्षकांनी आपापली ओळख करून द्यायला सांगितली. मी पहिल्यांदाच थोडी घाबरले पण नंतर सवय झाली.

जिथे नवीनच इमारत बांधत होते तेव्हा त्यातलाच एक नवीन वर्ग आम्हाला दिला. आम्ही सर्व मुले खूप खुश झालो. काही दिवसांनी आमच्या मैत्रिणी झाल्या. आम्हाला तेव्हा खूप भारी वाटलं. आमच्या वर्गात मुलं कमी आणि मुलीच जास्त होत्या. हळूहळू आम्ही त्या नव्या शाळेत रुळू लागलो. नव्या मैत्रिणींबरोबर गप्पागोष्टी करू लागलो नवी शाळा नव्या मैत्रिणी यामुळे मला खूप आनंद झाला.



**कु. मंजिरी सचिन पवार,**
**इयत्ता- सातवी**

**कु. शमिका नयनेश मुलूख,**
**इयत्ता- आठवी**









## चंद्रनगर शाळेत पंढरीची वारी

**दापोली-** आषाढी एकादशीनिमित्त दापोली तालुक्यातील जिल्हा परिषद चंद्रनगर मराठी शाळेत पंढरीची वारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विठुराया, रुक्मीणी आणि वारकऱ्यांच्या वेषात शाळेतील विद्यार्थ्यांनी पंढरीची वारी साजरी केली.

चंद्रनगर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रुपेश बैकर यांच्या हस्ते पंढरीची वारी कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी चंद्रनगर गावच्या सरपंच भाग्यश्री जगदाळे, रत्नागिरी जिल्हा नियोजन समिती सदस्य मोहन मुळे, पोलीसपाटील गौरी पागडे, चंद्रनगर शाळेचे मुख्याध्यापक मनोज वेदक, शिक्षक बापू घाडीगांवकर, मानसी सावंत, ज्येष्ठ वारकरी गणपत मुलूख, गौरी मुलूख आदी मान्यवर उपस्थित होते. आषाढी एकादशीनिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी दिंडी, भजन, फुगड्या, रिंगण आदी कार्यक्रम सादर केले. चंद्रनगर शाळेत आषाढी एकादशीनिमित्त साजरा झालेला पंढरीच्या वारी कार्यक्रम पाहण्यासाठी अनेक पालकही उपस्थित होते.

